महाराष्ट्र विधानपरिषद

तिसरे अधिवेशन, २०२५

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

रविवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२५ / अग्रहायण २३, १९४७ (शके)

(१) वैद्यकीय शिक्षण मंत्री (२) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री (३) मृद व जलसंधारण मंत्री (४) उद्योग, मराठी भाषा मंत्री (५) महिला व बालविकास मंत्री (६) ग्रामविकास व पंचायत राज मंत्री (७) कामगार मंत्री (८) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री	यांचे प्रभारी विभाग

प्रश्नांची एकूण संख्या - ४३

तारापूर औद्योगिक क्षेत्र (जि.पालघर) येथील मेडली फार्मास्युटिकल्स कंपनीत वायूगळती होऊन मृत्यूमूखी पडलेल्या कामगारांच्या वारसांना नुकसान भरपाई मिळणेबाबत

(१) * ४९४५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, डॉ.परिणय फुके, श्री.सुनिल शिंदे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि.पालघर) येथील मेडली फार्मास्युटिकल्स औषध कंपनीत दिनांक २१ ऑगस्ट, २०२५ रोजी अल्बेंडाझोल या जंतूनाशक औषधाचे उत्पादन सुरू असताना प्रक्रियेदरम्यान अचानक टँकमधून नायट्रोजन वायूची गळती होऊन चार कामगारांचा गुदमरून मृत्यू व दोन कामगार अत्यवस्थ झाल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची स्थानिक पोलीस, अग्निशमन दल आणि सुरक्षा व आरोग्य विभागाचे अधिकारी तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळांचे पथकामार्फत प्राथमिक चौकशी केली असून याबाबतची सविस्तर चौकशी सुरु असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तारापूर एमआयडीसीमधील याच परिसरातील प्लॉट क्र. १५० मधील आरती ड्रग्ज लिमिटेड या कंपनीमध्ये ॲसिड साठवणूकीच्या टाकीला भेग पडल्याने आम्ल गळती होऊन सालवड व शिवाजीनगर परिसरातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असल्याबाबतचे निवेदन समर्थन संस्थेने दिनांक २९ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान मा.उद्योग मंत्री तसेच जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त दुर्घटनेची चौकशी करून मृत कामगारांच्या वारसांना नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली व सदर कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली आहे तसेच तारापूर औद्योगिक क्षेत्र हे देशातील सर्वाधिक प्रदूषणकारी औद्योगिक क्षेत्र असल्याने त्या भागातील कामगारांच्या सुरक्षेसंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

ॲड. आकाश फुंडकर : (१) हे अंशत: खरे आहे,

मेडली फार्मास्युटिकल्स लि., एमआयडीसी, तारापूर (जि.पालघर) या कारखान्यात दिनांक २१ ऑगस्ट, २०२५ रोजी अल्बेंडाझोल या जंतू नाशक औषध उत्पादन प्रक्रिये दरम्यान मिथाईल मर्कॅप्टाईन या वायुची गळती होऊन त्याची बाधा झाल्याने ४ कामगारांचा मृत्यू झालेला होता व ०२ कामगारांना किरकोळ बाधा झाली. औषधोपचारानंतर त्यांना घरी सोडण्यात आले.

(२) हे खरे आहे.

(३) याबाबत समर्थन संस्थेचे दिनांक २६ सप्टेंबर, २०२५ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) मे.मेडली फार्मास्युटिकल्स लिमिटेड या कारखान्यात झालेल्या अपघाताच्या अनुषंगाने पोलीस विभागाने भारतीय न्याय संहिता, २०२३ अन्वये कारखाना व्यवस्थापकावर गुन्हा दाखल केला आहे.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत सदर घटनेची चौकशी करण्यात आलेली असून कारखान्याच्या भोगवटादार व व्यवस्थापकाविरुध्द कारखाने अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या भंगाकरीता प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पालघर यांच्या न्यायालयात भोगवटादार व व्यवस्थापकाविरुध्द खटला दाखल केला आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ या विभागाने जल (प्रदूषण नियंत्रण व प्रतिबंधक) कायदा, १९७४ व हवा (प्रदूषण नियंत्रण व प्रतिबंधक) कायदा, १९८१ अन्वये सदर कारखान्यास उत्पादन प्रक्रिया बंदची नोटीस दिलेली आहे

या घटनेमध्ये मृत चार कामगारांपैकी श्री.कल्पेश राऊत यांच्या वारसास देय अपघात नुकसान भरपाई रुपये १३,१६,५५०/- कामगार न्यायालय, ठाणे यांच्याकडे जमा करण्यात आलेले आहे. उर्वरीत ३ मृत कामगार हे राज्य कामगार विमा योजनेंतर्गत नोंदणीकृत असून या तीन्ही मृत कामगारांच्या वारसांना पेंशन मिळण्याबाबतचा दावा कारखाना व्यवस्थापनाने ईएसआयसीकडे दाखल केलेला आहे.

तसेच कारखाना व्यवस्थापनाकडून सर्व मृत कामगारांच्या वारसांना एकूण रुपये २२,५०,०००/- सानुग्रह अनुदान देण्यांत आलेले आहे. तसेच कामगारांचा उपचाराचा खर्च कारखाना व्यवस्थापनाकडून करण्यात आलेला आहे.

भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून कारखाना व्यवस्थापनास सुरक्षिततेबाबत प्रतिबंधात्मक उपाय योजना सुचविण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील विशेषत: अहिल्यानगर, अमरावती, नागपूर व कोल्हापूर येथील बहुतांश गावांमध्ये स्मशानभूमी नसल्याबाबत

(२) * ५७७४ श्री.संदीप जोशी, श्री.संजय केणेकर, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सत्यजीत तांबे, श्री.संजय खोडके, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमानुसार गावात स्मशानभूमी असणे अनिवार्य असतानाही प्रत्यक्षात राज्यातील हजारो गावांमध्ये अंत्यसंस्कारासाठी स्मशानभूमीच उपलब्ध नसल्याने मृत्यूनंतर अंत्यसंस्कारासाठी मोठ्या प्रमाणात अडचणी येत असून त्यातून जातीय व सामाजिक तणाव निर्माण होत असल्याची बाब दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहिल्यानगर जिल्ह्यातील १६३ ग्रामपंचायतींमध्ये स्मशानभूमीच्या बांधकामासाठी भूखंड उपलब्ध असतानाही निधी अभावी किंवा इतर प्रशासकीय त्रुटींमुळे येथील स्मशानभूमींची कामे प्रलंबित आहेत, अमरावती जिल्ह्यातही १४ तालुक्यातील ७०० गावांत आजही स्मशानभूमी नसल्यामुळे नागरिकांना अंत्यसंस्कार उघड्यावर किंवा दुसऱ्या ठिकाणी करावे लागत आहेत तसेच येथील ३६९ गावांमधील स्मशानभूमीला शेड व जागाही नाही, नागपूर जिल्ह्यातील १३ तालुक्यांमधील २०४ गावांमध्ये स्मशानभूमीची मूलभूत सुविधा नसल्याने या गावांतील अंत्यसंस्कार गावाबाहेर, रस्त्याच्या कडेला किंवा खाजगी जागांवर पार पाडले जात आहेत तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यासह इतर १२ तालुक्यांतील १५० गावांमध्ये व वाड्यांवर स्मशानभूमी नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून तदनुषंगाने राज्यातील प्रत्येक गावात स्मशानभूमी व त्याबाबतच्या सर्व सोयी सुविधा व आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयकुमार गोरे : (१), (२), व (३) अंशत: खरे आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील स्मशानभूमी नसलेल्या १६३ ग्रामपंचायतींपैकी ९ ग्रामपंचायतींच्या विकास कामांसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत. उर्वरीत १५४ ग्रामपंचायती व माहे सप्टेंबर २०२५ मधील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या ४३ ग्रामपंचायती अशा एकूण १९७ ग्रामपंचायतींना स्मशानभूमींची आवश्यकता आहे. सदर १९७ ग्रामपंचायतींपैकी ६४ ठिकाणी जागा उपलब्ध असून निधी उपलब्धतेनुसार या ग्रामपंचायतींना स्मशानभूमींची सुविधा उपलब्ध करून देणे शक्य आहे. १३३ ग्रामपंचायतींमध्ये स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध नसल्याने जिल्हाधिकारी, अहिल्यानगर कार्यालयाकडे जागा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही सुरू आहे.

अमरावती जिल्ह्यात स्मशानभूमी नसलेल्या ६०१ गावांपैकी ३५७ गावांमध्ये स्मशानभूमी करीता जागा उपलब्ध असून स्मशानशेड नाही. सन २०२५-२६ मध्ये जनसुविधा योजनेंतर्गत त्यापैकी एकूण ३९ ठिकाणी मंजुरी दिली असून पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

तसेच २४४ गावांमध्ये स्मशानभूमी करीता जागा उपलब्ध नाही. स्मशानभूमीकरीता जागा उपलब्ध नसलेले एकूण १५९ प्रस्ताव महसूल विभागाकडे सादर केले असून त्यापैकी ८ प्रस्तावांना छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व सेवा पंधरवाडा-२०२५ अंतर्गत मंजूरी दिली आहे.

नागपूर जिल्ह्यात स्मशानभूमी नसलेल्या १३ तालुक्यांमधील २०४ गावांपैकी ३६ गावांमध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२४-२५ व २०२५-२६ "ग्रामपंचायतींना जन सुविधासाठी विशेष अनुदान" या योजनेंतर्गत स्मशानभूमी व अनुषंगिक विकास कामांना मंजूरी दिली आहे. त्यापैकी बहुतांश कामे पूर्ण झाली असून, उर्वरित कामे प्रगतिपथावर आहे. उर्वरित १६८ ठिकाणी जागा उपलब्ध नसल्याने, जागा प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात स्मशानभूमी नसलेल्या एकूण १५० ग्रामपंचायती व संलग्न वाड्या वस्त्या व गांवे आहेत. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ग्रामपंचायतींना जनसुविधा पुरविणे या योजनेमधून सध्या स्मशानभूमी नसलेल्या वाड्या वस्त्या व गावांकरीता तेथील जागेच्या उपलब्धततेनुसार जिल्हा नियोजन समितीच्या प्रारूप आराखड्यामध्ये समावेश करून स्मशानभूमी व्यवस्था करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात आपत्कालीन वैद्यकीय सेवा प्रकल्पांतर्गत (१०८) रुग्णवाहिका वेळेवर न पोहोचल्यामुळे महिलांचा मृत्यू झाल्याबाबत

(३) * ५४७० श्री.एकनाथराव खडसे, श्री.सचिन अहिर, श्री.संजय केणेकर, श्री.वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.अमित गोरखे, श्री.अमोल मिटकरी, श्रीमती चित्रा वाघ : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आपत्कालीन वैदयकीय सेवा या प्रकल्पांतर्गत (१०८) रुग्णवाहिका ही सेवा सध्या सार्वजनिक व खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर चालविली जाते, मात्र पालघर सारख्या दुर्गम भागात रुग्णवाहिका वेळेवर न पोहोचल्यामुळे महिलांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या असून पालघर प्रमाणेच नाशिक, पुणे, परभणी, सोलापूर आणि छत्रपती संभाजीनगर येथे १०८ रुग्णवाहिका सेवेतंर्गत रुग्णवाहिका घटनास्थळी उपलब्ध न झाल्याने गोल्डन अवरमध्ये रुग्ण रुग्णालयात दाखल होत नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४ ते २०१५ या कालावधीत ९३७ रुग्णवाहिका चालविण्याचा बी.व्ही.जी. इंडिया कंपनीशी ३०० कोटी रुपयांचा करार केला गेला होता, त्यानंतर हा करार सन २०२४ पर्यंत वाढविण्यात आला असून गेल्या वर्षी एक नवीन निविदा काढण्यात आली तसेच २०२५ मध्ये संयुक्तपणे बी.व्ही.जी. इंडिया, सुमित फॅसिलिटी आणि एसएसजी ट्रान्सपोर्ट सॅनेटरी यांना सदर काम देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुमित फॅसिलिटीज ही एक शासकीय सल्लागार संस्था देखील असल्यामुळे कायदेशीररित्या निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास प्रतिबंध असतानाही त्याच कंपनीला ठेका दिल्याने निविदेसंबंधीच्या नियमांचे स्पष्ट उल्लंघन झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नव्या करारानुसार खरेदी करण्यात येणाऱ्या रुग्णवाहिका आणि उपकरणांचा खर्च सुमारे ५८० कोटी रुपये असून ऑपरेशन आणि देखभालीचा खर्च पहिल्या वर्षी ७०० कोटी रुपये आणि दरवर्षी त्यात आठ टक्के वाढ होणार असल्याने १ हजार ७५६ रुग्णवाहिका चालविण्यासाठी एकूण खर्च दहा हजार कोटी रुपयांहून अधिक येणार असल्याने हा खर्च अतिरिक्त असल्याचे आरोग्य तज्ज्ञांचे मत असून शेजारील कर्नाटक राज्याच्या धोरणाप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने थेट रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिल्यास कोट्यवधी रुपयांची बचत होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने वरील प्रकरणी झालेल्या अनियमिततेची तसेच उक्त घटनांची चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली तसेच सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सदर रुग्णवाहिकेची सेवा थेट उपलब्ध करुन देण्याबाबत व रुग्णवाहिकेवर कार्यरत डॉक्टर, कामगारांच्या पगार, विमा व सेवासुरक्षेबाबत शासनाने घेतलेल्या हमी-अटींची अंमलबजावणी करण्याबाबत तसेच कालबाह्य झालेल्या रुग्णवाहिका निर्लेखित करून नवीन रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश आबिटकर : (१) हे खरे नाही
(२) महाराष्ट्र आपत्कालीन वैदयकीय सेवा या प्रकल्पांतर्गत (१०८) रुग्णवाहिका सेवा राबविण्यासाठी सन २०१४-२०१९ पर्यंत ९३७ रुग्णवाहिका चालविण्याचा करार बी व्ही जी इंडियालि. यांच्या सोबत करण्यात आला होता.सदरील करार राबविण्यासाठी एप्रिल २०२४ पर्यंत मे. बी व्ही जी इंडियालि. यांना मुदतवाढ देण्यात आली होती. सदरील मुदतवाढ ही गंभीर रुग्णांना संदर्भ सेवा देण्याकरीता आवश्यक असल्यामुळे देण्यात आली होती. तदनंतर २०२५ मध्ये संयुक्त सेवा पुरवठादार मे सुमित फॅसिलिटीज, एस एस जी, बी व्ही जी इंडीया यांच्या सोबत करार करण्यात आलेला आहे.
(३) हे खरे नाही,
(४) सदरील करारा अंतर्गत रुग्णवाहिकांची संख्या ही ९३७ वरुन १७५६ इतकी वाढवण्यात आलेली आहे. महाराष्ट्रातील वाढलेल्या लोकसंख्येच्या निकषानुसार रुग्णवाहिकेच्या संख्येमध्ये वाढ करण्यात आलेली आहे. नियमीत रुग्णवाहीका (ALS, BLS) व्यतिरिक्त नवजात शिशु रुग्णवाहिका, बोट रुग्णवाहिका, टु व्हीलर ॲम्बूलन्स या प्रकारच्या रुग्णवाहिकांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे तसेच रुग्णवाहिकेमध्ये अत्याधुनिक यंत्रसामुग्री बसविण्यात आली असून रुग्णवाहिकांची संख्या आता ९३७ वरुन १७५६ झालेली असून १३ वर्षापुर्वी रुग्णवाहिकेच्या किंमतीच्या तुलनेत सद्य:स्थितीत रुग्णवाहिकेच्या किंमतीमध्ये नैसर्गिक वाढ झालेली आहे. त्यामुळे प्रकल्पाची रक्कम वाढलेली दिसून येत आहे. गोल्डन आवर्स मध्ये गंभीर रुग्णांना उपचारासाठी व संदर्भसेवा रुग्णवाहीका सेवा ही रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी अत्यंत गरजेची आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

जालना जिल्ह्यातील गर्भवती मातांची आरोग्य तपासणी करण्यात येत नसल्याबाबत

(४) * ४९०९ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गर्भवती मातांची आरोग्य तपासणी व जन्मानंतर बालकांची तपासणी ही प्रशासकीय स्तरावरुन होत असून सदर उपाययोजनेची जालना जिल्ह्यात योग्य प्रकारे अंमलबजावणी होत नसल्याने जिल्ह्यात मागील दोन वर्षात ३३ माता व ५६२ बालकांचा मृत्यू झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिलांची गर्भधारणेनंतर नियमित आरोग्य तपासणी, औषधोपचार, सकस आहार व बालकांच्या जन्मानंतर नियमित तपासणी व लसीकरण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश आबिटकर : (१) हे अंशत खरे आहे.

तथापि, जालना जिल्ह्यात दोन वर्षात माता मृत्यू १८ तर बालमृत्यू १६४ झालेले आहेत.
(२) गर्भवती माता व बालकाच्या आरोग्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येतात.

गरोदर माता नोंदणी (१२ आठवड्याच्या आतील) प्रसुती पुर्व किमान ३ आरोग्य तपासण्या, धनुर्वात प्रतिबंधक दोन मात्रा, लोहयुक्त गोळ्या प्रत्येक मातांना १८० गोळ्या, सुरक्षित संस्थात्मक प्रसुतीसाठी प्रोत्साहन, जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, प्रथम संदर्भ सेवा, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, मानव विकास कार्यक्रम, वात्सल्य कार्यक्रम, ॲनेमिया मुक्त भारत अभियान, HBNC कार्यक्रमाअंतर्गत आशा मार्फत नवजात शिशु व माता यांना सात गृह भेटी दिल्या जातात, विशेष नवजात शिशु काळजी कक्ष (SNCU), नवजात शिशु स्थिरीकरण कक्ष (NBSU), Comprehensive lactation Management Centre (CLMC), पोषण पुनवर्सन केंद्र (NRC), नवजात बालकांची घरच्या घरी घ्यावयाची काळजी (HBNC), घरच्या घरी लहान बालकांची काळजी (HBYC), एच.बी.वाय.सी अंतर्गत नवजात शिशुंना व माता यांना एकूण पाच गृह भेटी दिल्या जातात, “मा” (MAA), ॲनेमिया मुक्त भारत कार्यक्रम, जीवनसत्व “अ” कार्यक्रम Stop Diarrhea Campaign, Social Awareness and Action to Nutralize Pneumonia Successfully (SAANS), राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम, नियमित लसीकरण (बालकांचे जन्मत: लसीकरण व संपूर्ण लसीकरण एक वर्षापर्यंत देण्यात येते) इत्यादी.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग-२ यांनी नियमांचे उल्लंघन करुन निविदा प्रक्रिया राबविल्याबाबत

(५) * **५१९९ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग-२ यांनी नियमांचे उल्लंघन करुन निविदा प्रक्रिया राबविल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निविदा प्रक्रिया राबविताना शासन निर्णयाचे उल्लंघन करुन आपल्या मर्जीतील कंत्राटदारांना निविदा मंजूर करुन संगनमताने निविदा किंमतीच्या १० टक्के रक्कम घेऊन बेकायदेशीरपणे निविदा वाटप करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ई-निविदा प्रक्रियेमध्ये पारदर्शकता यावी व छोटया कंत्राटदारांना न्याय मिळावा याकरीता मा.मुख्यमंत्री महोदयांनी सन २०१४ मध्ये घेतलेला महत्वाकांक्षी निर्णयाचे पालन न करता बांधकाम विभाग-२ च्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन नियमांचे उल्लंघन करुन मोठ्या प्रमाणात निविदा प्रक्रियेत संगनमताने गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासन निर्णय हे जिल्हा परिषदेवर बंधनकारक असतानाही शासनाने सदर गैरव्यवहार प्रकरणी आढळून आलेल्या संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयकुमार गोरे : (१), (२), (३) व (४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर व कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग -२ यांनी नियमांचे उल्लंघन करुन निविदा प्रक्रिया राबविण्याची बाब निदर्शनास आली नाही.

तथापि, ई -निविदा प्रक्रीयेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग व ग्रामविकास विभागाकडून स्वतंत्ररित्या धोरण निश्चित केले जाते. जिल्हा परिषदेकडील ई - निविदा प्रक्रियेत प्रामुख्याने ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णयाचा प्राधान्याने अवलंब केला जात असल्यामुळे, सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ई - निविदेचे सर्वच शासन निर्णय जिल्हा परिषदेला लागू होत नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मनोर (जि.पालघर) ग्रामीण रुग्णालयात रुग्णवाहिका वेळेत न मिळाल्याने गर्भवती मातेचा मृत्यू झाल्याबाबत

(६) * ४६६६ श्री.मिलिंद नार्वेकर : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोर (जि.पालघर) ग्रामीण रुग्णालयात तात्काळ रुग्णवाहिका न मिळाल्याने उपचाराअभावी एका २२ वर्षीय गर्भवतीचा रुग्णवाहिकेतच दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दिनांक ८ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेमुळे पालघर जिल्ह्याच्या आरोग्यव्यवस्थेतील त्रुटी निदर्शनास आल्या असून, रुग्णांना रुग्णवाहिका उपलब्ध होत नसल्याने व गरीब रुग्णांना योग्य वेळेत उपचार मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि उक्त गर्भवती महिलेच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश आबिटकर : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणाच्या अनुषंगाने जिल्हा रुग्णालय, पालघर स्तरावरुन गठीत करण्यात आलेल्या ४ सदस्यीय समितीद्वारे चौकशी करण्यात आली आहे. मयत प्रीती जाधव यांना रक्तस्त्राव होत असल्याने रुग्णास त्वरित वलसाड येथे स्थलांतरित करण्याबाबत स्त्रीरोग तज्ञ यांचेकडून सांगण्यात आले. त्यानुसार ग्रामीण रुग्णालय, मनोर येथील १०२ ची रुग्णवाहिका अन्य ठिकाणी पाठविण्यात आली असल्यामुळे वैद्यकीय अधीक्षक यांनी दूरध्वनीद्वारे संपर्क करून खाजगी रुग्णवाहिकेची व्यवस्था करून रुग्णास वैद्यकीय अधिकारी यांचे सोबत पुढील अत्यावश्यक उपचारासाठी वलसाड येथे खाजगी रुग्णवाहिकेतून पाठविण्यात आले. रुग्णाची प्रकृती अतिगंभीर झाल्याने रुग्णास सिलवासा येथील वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. रुग्णाची प्रकृती गंभीर असल्याने रुग्णास Intubation करण्यात आले व पुढील अत्यावश्यक उपचार करण्यात आले. तथापि, दिनांक ०६/१०/२०२५ रोजी सकाळी सदर रुग्ण मयत झाल्याचे सिलवासा येथील डॉक्टरांनी कळविले सदर मृत्यू प्रकरणी नेमलेल्या चौकशीच्या अहवालामध्ये मातेचा मृत्यू हा Haemorrhagic and neurogenic shock due to uterine inversion नी झालेला आहे असे अभिप्राय नमूद आहेत. मयत प्रीती जाधव यांचे सिलवासा येथे शवविच्छेदन करण्यात आले असून Provisional PM Report मध्ये सदर मातेचे अतिरक्तस्त्राव (Postpartum Haemorrhage) ने मृत्यू झाल्याचे नमुद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत

(७) * ५३९७ श्री.राजेश राठोड, श्री.सुनिल शिंदे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बालकांच्या हक्कांचे संरक्षण, प्रचलन तसेच रक्षण करण्याच्या उद्देशाने माहे जुलै, २००७ मध्ये बाल हक्क संरक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली असून, या आयोगात एक अध्यक्ष व सहा सदस्यांची निवड करण्यात येत असून यामध्ये किमान दोन महिला सदस्य असणे बंधनकारक आहे, परंतु अध्यक्षपदासाठी महिला व बालविकास विभागाच्या आयुक्तांकडे किमान ७० जणांनी तर उर्वरित सदस्यत्वाकरीता ५०० जणांनी अर्ज सादर केले असून अद्यापही अध्यक्ष तसेच सदस्यांची निवड न झाल्याने याचा विपरीत परिणाम आयोगाच्या कामकाजावर होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आयोगाचे अध्यक्षपद मागील अनेक महिन्यांपासून रिक्त असल्याने आयोगाकडे येणाऱ्या तक्रारींच्या संख्यामध्ये वाढ होत असून अद्यापपर्यंत १,५०० हून अधिक तक्रारींबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष व अन्य सहा सदस्यांची नियुक्ती करुन आयोगाकडे येणाऱ्या तक्रारींचे निराकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे : (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगावर सदस्य व अध्यक्ष नियुक्त करण्याच्या अनुषंगाने प्राप्त नामांकनांमधून योग्य सदस्य व अध्यक्षांच्या नावाची शिफारस करण्यासाठी विहीत पध्दतीचा अवलंब करण्यात आला असून अनुक्रमे दिनांक ०२/०१/२०२५ व दिनांक १७/०७/२०२५ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त अर्जांची छाननी पूर्ण करुन सदर प्रस्ताव दिनांक २४/०७/२००७ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या राज्यस्तरीय त्रिसदस्यीय निवड समितीच्या समोर सादर करण्यात आला आहे

आयोगाच्या अध्यक्ष व सदस्य सदस्यांचा कार्यकाळ दिनांक ०३/०५/२०२५ रोजी संपुष्टात आल्याने आयोगाच्या अध्यक्ष पदाचा कार्यभार दिनांक १५/०५/२०२५ रोजीच्या शासन आदेशान्वये सचिव, महिला व बालविकास विभाग यांना सोपविण्यात आला होता.तथापि, प्रशासकीय कारणास्तव सदर कार्यभार दिनांक ०७/१०/२०२५ रोजीच्या शासन आदेशान्वये व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य यांचेकडे व तद्नंतर दिनांक ०१/१२/२०२५ रोजीच्या शासन आदेशान्वये आयोगाच्या अध्यक्षपदाचा कार्यभार श्रीमती नंदिनी आवडे, सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई सोपविण्यात आला असून आयोगाचे कामकाज सुरळीत चालु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

विदर्भासह राज्यातील लघु उद्योगांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

(८) * ४९७२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भासह राज्यातील अनेक सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांना (MSME) त्यांच्या वस्तूंची विक्री केल्यानंतर वेळेत देयके न मिळाल्यामुळे सदर उद्योजकांचे आर्थिक नुकसान होत असून त्यांच्या उत्पादन प्रक्रियेवर परिणाम होत असल्यामुळे त्यांनी शासनाकडे सहकार्याची मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने गंभीर दखल घेऊन अनेक सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांना (MSME) वेळेवर देयके मिळावीत तसेच त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत : (१) याबाबत उद्योग विभागाकडे निवेदन केल्याचे दिसून येत नाही.

(२) पुरवठादार सूक्ष्म व लघु उद्योजक यांच्या प्रलंबित देयकाबाबत, पुरवठादार व खरेदीदार यांच्यामध्ये समेट घडवून पुरवठादार उद्योजकांचे देयक लवकरात लवकर अदा करण्याबाबत सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास अधिनियम, २००६ अन्वये राज्यामध्ये प्रत्येक विभागासाठी अध्यक्ष, सदस्य आणि सदस्य सचिव यांचा समावेश असलेली सूक्ष्म व लघु उपक्रम सुकरता परिषद स्थापन करण्यात आलेली आहे.

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास अधिनियम, २००६ मधील तरतूदीनुसार खरेदीदाराने MSME युनिटकडून वस्तू किंवा सेवा स्विकारल्याच्या तारखेपासून जास्तीत जास्त ४५ दिवसांच्या आत देयके अदा करणे बंधनकारक आहे. खरेदीदार आणि विक्रेता यांच्यातील करारामध्ये यापेक्षा जास्त मुदत ठरवता येत नाही. परंतु ४५ दिवसांनंतरही देयके न दिल्यास, खरेदीदाराला प्रलंबित रकमेवर भारतीय रिझर्व्ह बँकेच्या बँक दराच्या तिप्पट दराने चक्रवाढ व्याज देणे अनिवार्य आहे. हे व्याज खरेदीदाराच्या आयकर गणनेमध्ये खर्च म्हणून दाखवता येत नाही, यामुळे खरेदीदारावर आर्थिक बोजा पडतो.

पुरवठादार सूक्ष्म व लघु उद्योजक (तक्रारदार) देयके मिळावीत याकरीता केंद्र शासनाकडून उपलब्ध करुन दिलेल्या Online Dispute Resolution (ODR) for Delayed payments या प्रणालीव्दारे उक्त सुकरता परिषदांकडे आपले अर्ज दाखल करतात. सदर प्रणालीव्दारे प्राप्त प्रलंबित देयकाबाबत संबंधित सुकरता परिषदेमार्फत सुनावणी घेऊन तात्काळ प्रकरण निकाली काढण्याची कार्यवाही करण्यात येते.

राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी उद्योग विभागामार्फत सामुहिक प्रोत्साहन योजना – २०१९, औद्योगिक समूह विकास योजना व मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना या प्रमुख योजना राबविल्या जातात. सामुहिक प्रोत्साहन योजना – २०१९ अंतर्गत व्याज अनुदान, विद्युत शुल्क माफी, मुद्रांक शुल्क माफी, विद्युत कर अनुदान व कर सवलत दिली जाते. केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना (MSE-CDP) अंतर्गत सामायिक सुविधा केंद्र उभारणीसाठी मंजूर प्रकल्प किंमतीच्या ६०% ते ८०% एवढे अनुदान केंद्र शासनाकडून तसेच १५% ते २०% एवढे अनुदान राज्य शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येते. महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना (MSICDP) अंतर्गत क्षमतावृध्दी कार्यक्रमाकरीता रुपये १०.०० लक्ष व सामायिक सुविधा केंद्र उभारणीसाठी रुपये १०.०० कोटीच्या मर्यादेत मंजूर प्रकल्प किंमतीच्या ७०% ते ९०% अनुदान राज्य शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच राज्यातील होतकरु युवक/युवतींसाठी स्वयंरोजगारास प्रोत्साहन देणारी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना (CMEGP) याअंतर्गत सेवा व कृषीपुरक उद्योगासाठी तसेच उत्पादन क्षेत्रातील उद्योगासाठी राज्य शासनाकडून प्रवर्ग निहाय प्रकल्प मंजूरीवर १५% ते ३५% अनुदान (मार्जिन मनी) देण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात कृत्रिम बुध्दीमत्ता आणि ऑटोमेशनच्या क्रांतीमुळे नोकऱ्यांमध्ये कपात होत असल्याबाबत

(९) * ४७७० श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहिती तंत्रज्ञान (IT) व सॉफ्टवेअर क्षेत्रात कृत्रिम बुध्दीमत्ता (AI) व ऑटोमेशनच्या वाढत्या वापरामुळे विशेषतः कमीस्तरीय कोडिंग तसेच पुनरावृत्तीच्या कामांवरील नोकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कपात होण्याची शक्यता निर्माण झाली असून, त्याचा थेट परिणाम राज्यातील हजारो तरुणांच्या रोजगारावर होणार असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृत्रिम बुध्दीमत्ता (AI) मुळे सॉफ्टवेअर क्षेत्रातील नेमक्या कोणत्या प्रकारच्या नोकऱ्या धोक्यात आल्या आहेत, याबाबतचे सद्य:स्थितीतील तपशिलवार अध्ययन शासनाने केले आहे काय,
(३) असल्यास, सदर गंभीर समस्येच्या पार्श्वभूमीवर बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात राज्यातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणते धोरणात्मक निर्णय घेतले आहेत तसेच AI/ML आधारित अभ्यासक्रम, प्रोजेक्ट-आधारित शिक्षण (Project-Based Learning) व इंडस्ट्री इंटर्नशिप (Industry Internships) अनिवार्य करण्याबाबत विद्यापीठांना कोणते मार्गदर्शक सूचनादेश दिले आहेत काय व त्याची अंमलबजावणी केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत : (१) माहिती तंत्रज्ञान (IT) व सॉफ्टवेअर क्षेत्रामध्ये कृत्रिम बुध्दीमत्ता (AI) व ऑटोमेशनचा वापर वाढत असल्याचे सर्वसाधारणपणे पाहण्यात येत आहे. या बदलाचा राज्यातील युवकांच्या विशेषत: पुनरावृत्ती स्वरुपाच्या व कमी कौशल्यावर आधारीत माहिती तंत्रज्ञान सेवांमधील रोजगारात मोठ्या प्रमाणात परिणाम झाल्याचा कोणताही अधिकृत अहवाल/ अभ्यास दस्तावेज उद्योग संचालनालयाकडे प्राप्त झालेला नाही.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील एकूण रोजगारातील परिवर्तनास एआय/ऑटोमेशन हे एकमेव कारण नसून जागतिक आर्थिक परिस्थिती व तंत्रज्ञानातील बदल, खर्च नियंत्रण इत्यादी बाबी कारणीभूत आहेत. कृत्रिम बुध्दीमत्ता व ऑटोमेशनमुळे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात उच्च कौशल्यधारीत नवीन रोजगार संधी देखील निर्माण होत आहेत.

(२) सदर बाबत कोणताही अधिकृत अहवाल प्राप्त नसल्यामुळे राज्य शासनाने स्वतंत्र अध्ययन केले नाही.

(३) आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI), मशीन लर्निंग (ML), ऑटोमेशन, क्लाऊड कंप्युटींग, सायबर सुरक्षा, बीग डेटा इत्यादी उद्योन्मुख तंत्रज्ञानामुळे रोजगाराचे स्वरूप बदलत असून, या परिस्थितीत राज्य शासनाद्वारे कौशल्य विकास, उच्च कुशल रोजगार निर्मिती व उद्योग-शिक्षण संस्था साखळी मजबूत करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.

राज्य शासनाने, माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०२३ जाहीर केले असून या धोरणांतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा, मशीन लर्निंग, ब्लॉक-चेन, इ. यावर आधारित उद्योन्मुख तंत्रज्ञान उद्योगांना विशेष प्रोत्साहने लागू करण्यात आली आहेत. यामध्ये भांडवली अनुदान, वीज दर अनुदान, माहिती तंत्रज्ञान उद्यानातील घटकांना मुद्रांक शुल्क माफी, प्रमाणपत्र सहाय्य तसेच रोजगार निर्मितीला चालना देणेकरीता भरती सहाय्य इ. प्रोत्साहनांचा समावेश आहे.

उद्योन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रातील स्टार्ट-अप्स घटकांना सक्षमित करुन त्याद्वारे रोजगार निर्मितीच्या उद्देशाने "एम हब" हे राज्यस्तरिय उत्कृष्टता केंद्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाद्वारे कळंबोली येथे विकसित केले जात आहे. उच्च कुशल रोजगार निर्मितीला चालना देण्याकरीता "एम हब" अंतर्गत नोंदणीकृत घटकांकरीता कौशल्य विकास सहाय्य अनुज्ञेय करण्यात आले आहे.

तसेच राज्य शासनाने ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस्, गेंमिग, कॉमिक्स, एक्सटेंडेड रियालिटी (AVGC-XR) धोरण २०२५ दिनांक ३/११/२०२५ अन्वये जाहीर केले असून याअंतर्गत कौशल्य, कौशल्यवर्धन आणि उद्योजकतेला प्रोत्साहने देऊन ५ लाख रोजगाराच्या संधी (प्रत्यक्ष + अप्रत्यक्ष) निर्माण

करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. राज्य महामंडळांसाठी एव्हीजीसी आधारित अभ्यासक्रमांचा विकास करण्याकरीता समर्पित कौशल्य सल्लागार समितीची स्थापना, ट्रेन-द-ट्रेनर कार्यक्रम, व्यावसायिक प्रशिक्षण, इंटर्नशिप आणि अप्रेंटिसशिपद्वारे कौशल्य विकासाला प्रोत्साहन देय करण्यात आले आहे.

राज्य शासनाने जागतिक क्षमता केंद्र धोरण २०२५ दिनांक ०३/११/२०२५ अन्वये जाहीर केले असून उद्योग-आधारित अभ्यासक्रम एकत्रित करून, अत्याधुनिक संशोधन आणि प्रगत डिजिटल तसेच तांत्रिक कौशल्य विकासाच्या माध्यमातून ४,००,००० उच्च-कुशल नोकऱ्या निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. प्रतिभा संपादन आणि कार्यबल सक्षमीकरणाकरीता विद्यापीठ भागीदारी, नियोक्त्याद्वारे प्रशिक्षण, अप्रेंटिसशिप आणि इंटर्नशिप, कार्यरत व्यावसायिकांना एआय, क्लाउड कॉम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, डेटा ॲनालिटिक्स आणि ऑटोमेशन यासारख्या उद्योन्मुख क्षेत्रांमध्ये प्रगत कौशल्ये संपादनासाठी 'कमवा व शिका' अपस्किलिंग कार्यक्रम, इ. संबंधित संस्था/विभागांच्या सहकार्याने राबविण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांमधील आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

(१०) * ४८९१ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाद्वारे राबविण्यात येत असलेल्या सुरक्षा किट व मध्यान्ह भोजन योजना याअंतर्गत दर महिन्याला कोटयवधीं रुपयांचा खर्च केला जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही संघटनांनी याबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून न्यायालयातर्फे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाद्वारे राबविण्यात येत असलेल्या सुरक्षा किट व मध्यान्ह भोजन योजनेच्या गैरव्यवहाराची चौकशी करून शासनाच्या निधीचा अपव्यय केलेल्या खर्चाची रक्कम वसूल करण्याचा निर्णय मा.उच्च न्यायालयाने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर : (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांसाठी मंडळाकडे उपकराच्या माध्यमातून जमा होणाऱ्या निधीमधून विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ च्या नियम ४५ मध्ये मा.मंत्रिमंडळ मान्यतेने सुधारणा करण्यात आल्या असून दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या अधिसूचनेन्वये मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना त्यामध्ये अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत.

सदर योजनांमध्ये वैयक्तिक लाभाच्या (DBT in Money) योजना (उदा.आर्थिक सहाय्य योजना, सामाजिक सहाय्य, शैक्षणिक सहाय्य आणि आरोग्य विषयक) असे वर्गीकरण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे मंडळाच्या In-Kind स्वरुपातील योजना (उदा.सुरक्षा संच, अत्यावश्यक संच, गृहपयोगी वस्तू संच वाटप, तपासणी ते उपचार) अस्तित्वात आहेत.

सन २०१७-१८ मध्ये बांधकाम कामगारांची जिवीतहानी होऊ नये व त्यांची नोंदणी वाढविण्याच्या प्रमुख उद्देशाने मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांसाठी मोफत सुरक्षा संच ही वस्तू स्वरूपातील (DBT in Kind) लाभ वाटपाची योजना सुरू करण्यात आली असून सद्य:स्थितीत सुधारित सुरक्षा संच वाटप योजना सुरु करण्यात आली आहे.

तसेच सन २०१९-२० मध्ये मंडळाकडील नोंदीत जिवीत (सक्रिय) बांधकाम कामगारांसाठी प्रायोगिक तत्वावर मध्यान्ह भोजन योजना सुरू करण्यात आली. सन २०२१-२२ पासून सदर योजनेचा विस्तार टप्प्याटप्याने संपूर्ण राज्यात करण्यात आला. तद्नंतर माहे नोंव्हेंबर, २०२३ पासून सदर योजना बंद करण्यात आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या मध्यान्ह भोजन तसेच सुरक्षा संच योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात माहे जानेवारी, २०२५ मध्ये मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे जनहित याचिका क्र.५४/२०२५ दाखल झालेली आहे. तथापि, सदर याचिका मा.न्यायालयापुढे अद्याप सुनावणीसाठी आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

अकोला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

(११) * ५६५५ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील सर्वोपचार रुग्णालयात अकोला जिल्ह्यासह बुलढाणा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यातील शेकडो रुग्ण रोज उपचारासाठी येथे येत असतात, परंतु सदर सर्वोपचार रुग्णालयात डॉक्टर, परिचारीका व इतर कर्मचारी यांची संख्या अपुरी असून सदर रुग्णालयात वॉर्डबॉय व सफाई कामगारांची एकूण ३५० पदांची आवश्यकता असताना फक्त १६६ कामगार सद्य:स्थितीत कार्यरत असल्याने रुग्णालयात कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण येत असल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्यसेवेच्या वाढत्या मागणीच्या प्रमाणात रुग्णालयातील मनुष्यबळ अपुरे असल्याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांच्यामार्फत वर्ग १ ते ४ मधील २ हजार ४२५ कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध शासनाकडे सादर केला असून सहा महिने उलटूनही अद्याप त्यास शासनाने मंजूरी दिली नसल्याने येथील आरोग्यसेवा व्यवस्थेवर विपरीत परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयात दररोज शेकडो रुग्ण उपचारासाठी दाखल होत असून वैद्यकीय उपचारासह आवश्यक सहाय्य व सेवा मिळणे अपेक्षित असताना कामगारांच्या कमी संख्येमुळे कार्यरत कामगारांना रुग्णांना स्ट्रेचरवर किंवा व्हीलचेअरवरून इतरत्र हलविणे, गंभीर रुग्णांना सिटीस्कॅन एक्स-रे किंवा तपासणी करण्याकरीता ने-आण करणे या मुख्य कामांऐवजी इतर कामे करावी लागत असल्याने सदर कामे ही रुग्णांच्या नातेवाईकांनाच करावी लागत आहेत, हे ही खरे आहे,
(४) असल्यास, सदर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाकडून शासनास प्राप्त झालेल्या प्रशासनाच्या आकृतिबंध प्रस्तावास मान्यता देण्याबाबत व डॉक्टर, परिचारीका व इतर कर्मचारी वर्ग व कामगारांच्या भरतीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ : (१) अकोला जिल्ह्यातील सर्वोपचार रुग्णालयातील कार्यरत डॉक्टर्स / अध्यापक / अधिकारी व कर्मचारी नियमित १२१ पदे नियमित पदे भरलेली आहेत. त्याव्यतिरिक्त वर्ग-३ व ४ मधील आवश्यक मनुष्यबळ बाह्ययंत्रणेद्वारे उपलब्ध करून घेण्यात आले आहे. सदर कर्मचाऱ्यांमार्फत वैद्यकीय उपचारासह सहाय्य व रुग्णसेवा करण्यात येत आहे. स्वच्छताविषयक कामे बाह्ययंत्रणेद्वारे करून घेण्यात येत आहेत.
(२) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न रुग्णालयाकरीता आवश्यक डॉक्टर्स, परिचारिका व इतर कर्मचारी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आकृतिबंध तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) हे खरे नाही. सदर कामे बाह्यस्त्रोताद्वारे उपलब्ध करून घेण्यात आलेल्या मनुष्यबळाद्वारे करण्यात येतात.
(४) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अखत्यारितील महाविद्यालये व रुग्णालयांकरीता सुधारित आकृतिबंध तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच वेळोवेळी रिक्त होणारी पदे पदोन्नतीने, अनुकंपा पध्दतीने, सरळसेवेने व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

विदर्भातील औद्योगिक वसाहतींमधील बंद उद्योगांना चालना देण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

(१२) * ५००६ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.संजय केणेकर, श्री.सुनिल शिंदे : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील औद्योगिक वसाहतींमध्ये एकूण १ हजार २४६ युनिट बंद आहेत तसेच सुमारे १३,९०६ युनिट्सना भूखंड वाटप होऊनही अद्याप सुरू झालेली नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील औद्योगिक वसाहतीमधील बंद उद्योगांना चालना देण्यासाठी तसेच भूखंड वाटप झालेले युनिट कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.उदय सामंत : (१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या दिनांक ३१/१०/२०२५ च्या अहवालानुसार औद्योगिक वसाहतीमध्ये एकूण भुखंड १४८२१ भूखंड वाटप झालेले असून ७००६ उद्योग घटक कार्यरत आहेत व बंद घटकांची संख्या १४१९ आहे.

(२) बंद उद्योगांना चालना देण्यासाठी तसेच भूखंड वाटप झालेले युनिट कार्यान्वित करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दिनांक १५/०३/२०२४ रोजीच्या परिपत्रकानुसार पुनश्च विकास कालावधी देण्याचे धोरण आहे. तसेच विशेष मुदतवाढ योजनेंतर्गत मुदतवाढ देण्याचे धोरण आहे. उद्योगांना अत्यंत कमी दरात पाणीपुरवठा तसेच सेवाशुल्क आकारले जात आहे. आवश्यक मूलभूत सुविधा देण्यासाठी (जसे रस्ते, पाणी व वीज) प्रयत्न करणे व विद्युत दरात सवलत देणे इत्यादी उपाययोजना केल्या जात आहेत.

मुंबई सहायक उपक्रम (खास उपबंध) अधिनियम, १९५८ नुसार एखाद्या उद्योग घटकास "सहायक उपक्रम" म्हणून घोषित केले जाते. त्यानुसार सदर उद्योग घटकास एक वर्षासाठी कायदेशीर तसेच आर्थिक कारवाई पासून संरक्षण प्राप्त होते. सदर प्रकारचे संरक्षण हे अशा उद्योग घटकास वेळोवेळी आवश्यकतेनुसार एक वर्षाच्या कालावधीसाठी वाढवून दिले जाते. उद्योग घटकास जास्तीत जास्त पंधरा वर्षापर्यंत सहायक उपक्रम म्हणून घोषित केले जाऊ शकते.

आजारी उद्योग घटकांशी संबंधित प्रगती, तक्रारी, समस्या आणि उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरीय आजारी उद्योग घटक पुनर्वसन समिती आणि उद्योग मित्र समिती स्थापन करण्यात आली आहे.

सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास अधिनियम, २००६ नुसार सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांसाठी ६ विभागीय सुकरता परिषदा स्थापन केलेल्या आहेत. उद्योग घटकामधील विलबिंत देयकाबाबत अडचणी Online Dispute Resolution (ODR) या प्रणालीव्दारे सोडविल्या जातात.

सामुहिक प्रोत्साहन योजना, २०१९ या योजनेंतर्गत, उद्योग घटकाने केलेल्या गुंतवणुकीनुसार त्यास पात्रता प्रमाणपत्र देण्यात येऊन, प्रोत्साहन अनुदान व इतर अनुषंगिक सवलती उदा. विक्रीकर परतावा, व्याज दर अनुदान इत्यादी प्रोत्साहने दिली जातात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना ई-केवायसी करताना तांत्रिक अडचणी येत असल्याबाबत

(१३) * ५१४५ श्रीमती चित्रा वाघ : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" या योजनेच्या ई-केवायसीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून त्यानुसार सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण चालू आर्थिक वर्षात परिपत्रकांच्या दिनांकापासून २ महिन्यांचा आत करणे बंधनकारक असल्याने मुख्यमंत्री माझी

लाडकी बहीण योजनेच्या पात्र भगिनींना ई–केवायसी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करताना अनेक तांत्रिक अडचणी येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या पात्र भगिनींना ई–केवायसी करताना रजिस्ट्रेशन केल्यानंतर ओटीपी न येणे किंवा उशिरा येणे, साईट बंद होणे, सर्व्हर स्लो होणे इ. कारणामळे ई-केवायसी होत नसल्याने योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी करुन पात्र लाभार्थी महिलांना ई-केवायसी करण्यासाठी येणाऱ्या अडचणी दूर करण्याबाबत व मुदतवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे : (१), (२) व (३) ''मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण'' या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी e-KYC माध्यमातून Aadhaar Authentication करण्यास शासन परिपत्रक दिनांक १८/०९/२०२५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण चालू आर्थिक वर्षात दिनांक १८/०९/२०२५ दिनांकापासून २ महिन्यांच्या (दिनांक १८/११/२०२५ पर्यंत) कालावधीची मुदत देण्यात आली होती.

तथापि, राज्यातील काही जिल्ह्यात ओढवलेली नैसर्गिक आपत्ती, या योजनेच्या पात्र लाभार्थ्यांकडे त्यांच्या पती किंवा वडीलांचा मृत्यू झाल्यामुळे त्यांच्या आधार क्रमांकावर OTP प्राप्त होण्यास येत असलेल्या अडचणी तसेच याशिवाय या योजनेंतर्गत अनेक लाभार्थी महिलांनी e-KYC प्रक्रिया पूर्ण केलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यानुषंगाने ''मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण'' या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी e-KYC माध्यमातून Aadhaar Authentication करण्याकरीता शासन निर्णय दिनांक १८/११/२०२५ अन्वये दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

उल्हासनगर येथील शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

(१४) * ५६४५ श्री.श्रीकांत भारतीय : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा रूग्णालयाचा दर्जा प्राप्त असलेल्या उल्हासनगर शासकीय मध्यवर्ती रूग्णालयाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून या रूग्णालयातील महिला रूग्णांच्या वॉर्डमधील शौचालयांना दरवाजे नसल्याची तसेच रूग्णालय प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी कोणतीही जबाबदारी स्विकारत नसल्याने रूग्णालयात अस्वच्छता, सर्वत्र पसरलेली घाण, मूलभूत सुविधांचा अभाव इ. मुळे येथे रूग्णांचे हाल होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी नागरिकांकडून रूग्णालय प्रशासनाकडे व महानगरपालिका प्रशासनाकडे वारंवार तक्रारी सादर करूनही या प्रकरणी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येथील शौचालयांची तातडीने दुरूस्ती करून रूग्णालय व्यवस्थापनातील त्रुटी दूर करण्याबाबत तसेच या प्रकरणी कार्यवाही करण्यास विलंब करणारे रूग्णालय प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित दोषी अधिकारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश आबिटकर : (१) मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर-३ या रुग्णालयातील सर्व कक्षाचे व स्वच्छता गृहांचे दरवाजे पूर्णपणे बसविलेले असून ते सुस्थितीत आहेत. माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये रुग्णालयातील तुटलेला दरवाजा महिला रुग्णांच्या कक्षाचा नसुन आपत्कालीन विभागातील एका शौचालयाचा तुटला होता.त्यानुषंगाने सा.बां.विभागाने आपत्कालीन विभागातील शौचालयाचा तुटलेला दरवाजा तात्काळ बसविलेला आहे.

तसेच मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, कोकण, मुंबई यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २ ठाणे व कार्यकारी अभियंता, विद्यृत सा.बां. विभाग ठाणे यांना मध्यवर्ती रुग्णालय उल्हासनगर-३ येथील मूलभूत सुविधा संडास व बाथरुमच्या ड्रेनेजची समस्या, पाणीपुरवठा कमी दाबाने येणे, मच्छर प्रतिबंधक जाळया तुटणे, वायरिंग व ट्यूबलाईट खराब होणे इ. सुस्थितीत ठेवणेबाबत अर्धशासकीय पत्र दिनांक २३-०९-२०२५ रोजी कळविल्यानुसार सा.बां.विभागाकडून दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत.

तसेच या रुग्णालयामधील सफाई कर्मचारी यांच्याकडुन रुग्णालय व रुग्णालयीन परिसरातील दैनंदिन स्वच्छता शासनाच्या मार्गदर्शक सूचनेतील वेळापत्रकानुसार नियमितपणे करण्यात येते.
(२) हे खरे नाही.

आपत्कालीन कक्षातील कर्मचाऱ्यांनी सदर बाब संबंधित विभाग व जिल्हा शल्यचिकीत्सक यांच्या निर्दशनास आणुन दिली होती. त्यानुसार सा.बां.विभागाने आपत्कालीन विभागातील शौचालयाचा तुटलेला दरवाजा तात्काळ बसवून दिलेला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात विशेषत: बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये मलेरिया प्रतिबंधक औषधसाठा उपलब्ध करुन देण्याबाबत

(१५) * ५५५९ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यात मोठ्या प्रमाणात मलेरियाची साथ पसरली असून बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे मलेरिया प्रतिबंधासाठी निकषांनुसार पुरेशी औषधे उपलब्ध नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईमध्ये एसीटी-एसपी औषधांची कमतरता असून मोठ्या प्रमाणात खरेदी केल्या जाणाऱ्या औषधसाठ्यांमध्ये ती उपलब्ध झालेली नसल्याने रुग्णांना सदर औषध उपलब्ध करून देण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत सखोल चौकशी करुन मुंबईसह राज्यात पसरत असलेली मलेरियाची साथ आटोक्यात आणण्यासाठी कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश आबिटकर : (१) हे खरे नाही.

मलेरिया प्रतिबंधासाठी निकषानुसार मुंबईसह राज्यात औषधोपचार उपलब्ध आहे. माहे ऑक्टोबर,२०२५ मध्ये राज्यामध्ये मलेरिया प्रतिबंधासाठी निकषानुसार पुरेशी औषधे उपलब्ध आहेत.
(२) मुंबई महानगरपालिकेकडून एसीटी-एसपी औषधाबाबत राज्य शासनाकडे वेळोवेळी मागणी प्राप्त झाली आहे. त्या मागणीनुसार शासनाकडून एसीटी-एसपी औषध उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. तसेच, बृहन्मुबंई महानगरपालिके तर्फे स्थानिक पातळीवर औषध खरेदी करण्यात आलेली आहे.

वैद्यकीय महाविद्यालये, रुग्णालये आणि सर्वसाधारण रुग्णालयांच्या क्लिनिकल सल्ल्यानुसार तसेच, रुग्णांना सल्फा अलर्जी असल्यास, एसीटी-एल देण्यात येत आहे.
(३) हिवताप आजारावर नियंत्रण करण्याकरीता रोगप्रतिबंधात्मक व उपचारात्मक उपाययोजना नियमित राबविण्यात येत आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिका आराखडा नुसार व राज्यात मलेरिया नियंत्रणासाठी जलद सर्वेक्षण, तपासणीचा विस्तार, किटक नियंत्रण, नियमित कंटेनर सर्वेक्षण, जैविक डास अळी नियंत्रण, फॉगींग, हिवताप दूषित रुग्णांना समुळ उपचार, जनजागृती मोहिम, आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण इत्यादी कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

हिवताप आजाराच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि नियंत्रणासाठी, सेलेब्रिटींच्या माध्यमातून जनजागृती विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

विशेष कार्यवाहीअंतर्गत अति जोखमीच्या क्षेत्रांसाठी विशेष कृती आराखडा तयार करून डास नियंत्रण आणि Odd Article Removal करण्यासाठी धडक मोहीम राबविली जाते.

प्रशिक्षण-खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांना हिवताप निदान आणि उपचारांसंदर्भातील शासनाच्या नवीनतम मार्गदर्शक तत्वांचे प्रशिक्षण वेळोवेळी दिले जाते. जागतिक आरोग्य संघटनेशी समन्वय साधून विशेष कार्यशाळा घेऊन मलेरिया नियंत्रणासाठी, विभागनिहाय कृती आराखडा तयार केला आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

राज्यातील विशेषत: विदर्भातील औद्योगिक विकासाला चालना मिळण्यासाठी विशेष आर्थिक क्षेत्र अंतर्गत तरतुदींमध्ये सुधारणा करणेबाबत

(१६) * **५०५९ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील औद्योगिक उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढविणे, गुंतवणूक आकर्षित करणे आणि विशेषतः विदर्भाच्या औद्योगिक विकासाला चालना मिळण्यासाठी भारताच्या आर्थिक विकास धोरणात सेझला

अधिक प्रभावीपणे समाविष्ट करण्याच्या सुधारणेला प्राधान्य देण्याची असोसिएशन फॉर इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट (एआयडीसी) यांनी राज्य शासनामार्फत केंद्रीय वाणिज्य मंत्री यांना विनंती केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विनंती केंद्र शासनाने मान्य केल्यास राज्यांमधील औद्योगिक उत्पादन वाढेल, स्पर्धात्मकता सुधारेल आणि सेझ युनिट्सना निर्यात तसेच देशांतर्गत बाजारपेठेत अधिक उत्पादन वाढविण्यास सक्षम बनविले जाईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाने उक्त विनंती मान्य करावी याकरीता राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत : (१) हे खरे नाही. राज्य शासनामार्फत अशा प्रकारची कोणतीही विनंती केंद्रीय वाणिज्य मंत्री यांना करण्यात आलेली नाही.

तथापि, असोसिएशन फॉर इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट (एआयडीसी) यांनी विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) अधिनियम व नियमांमध्ये प्रस्तावित दुरुस्त्यांची अंमलबजावणी वेगाने करण्यासाठी हस्तक्षेप करावा आणि सेझमध्ये निर्मित उत्पादने देशांतर्गत बाजारात विक्रीस परवानगी द्यावी व या विक्रीवर संपूर्ण तयार उत्पादनावर नव्हे तर वापरलेल्या (आयातित) कच्च्या मालावर "ड्युटी फोरगोन बेसिस" लागू करावा, अशी विनंती दिनांक २६/०७/२०२५ च्या पत्रान्वये केंद्रीय वाणिज्य मंत्री यांना केली आहे.

(२) विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) संदर्भातील धोरणात्मक निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार केंद्र शासनाकडे आहेत. असोसिएशन फॉर इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट (एआयडीसी) यांनी केंद्र शासनास सादर केलेल्या विनंतीची वैधानिकता, उपयुक्तता तपासून मंजूरीबाबत निर्णय घेण्याबाबतची बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे.

(३) विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) अधिनियम व नियमांची अंमलबजावणी ही पूर्णतः केंद्र शासनाच्या अखत्यारीतील बाब आहे. त्याबाबत राज्य शासनाकडून कोणताही धोरणात्मक निर्णय घेणे अभिप्रेत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात एकात्मिक बालविकास सेवा योजनेतील तांत्रिक पदांना मुदतवाढ देण्याबाबत

(१७) * ४९५२ श्री.शशिकांत शिंदे : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकात्मिक बालविकास सेवा योजनेतील पोषण अभियानांतर्गत राज्यातील सर्वच तालुका स्तरावर सन २०१९ मध्ये नेमलेल्या गट समन्वय (तांत्रिक मनुष्यबळ) कंत्राटी कर्मचारी यांना अद्याप मुदतवाढ देण्यात आली नसल्याने त्यांच्या कुटुंबियांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंत्राटी कर्मचाऱ्यांना मुदतवाढ न देण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, एकात्मिक बालविकास सेवा योजनेतील उक्त कंत्राटी कर्मचारी यांना मुदतवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे : (१), (२) व (३) पोषण अभियान या केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत सन २०१९ मध्ये तांत्रिक पदे महाआयटीमार्फत नियुक्त एजन्सी कडून तर अतांत्रिक पदे विभागामार्फत प्रचलित कार्यपध्दतीनुसार बाह्यस्त्रोताद्वारे भरण्यात आली होती. परंतु महाआयटीचे दर केंद्र शासनाने निश्चित केलेल्या दराशी सुसंगत नसल्याने व सदर कार्यक्रम केंद्र शासनाचा असल्याने महाआयटी सोबतचा यासंदर्भातील करार संपुष्टात आणून सदर केंद्र पुरस्कृत कार्यक्रमामधील तांत्रिक व अतांत्रिक पदे विभागाने निविदा प्रक्रियेद्वारे एजन्सी नियुक्ती करून भरण्याबाबत शासनाने निर्णय घेतला होता.

त्याअनुषंगाने एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्तालयामार्फत निविदा प्रक्रिया राबवून शासन निर्णय दिनांक १०/१०/२०२५ अन्वये राज्य, जिल्हा व प्रकल्पस्तरावर ६२९ तांत्रिक व ७ अतांत्रिक पदांवर मनुष्यबळ नियुक्तीकरीता मे. स्मार्ट सर्व्हिसेस या बाह्यस्त्रोत संस्थेची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर संस्थेमार्फत मनुष्यबळ नियुक्ती सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्ह्यातील जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गतची कामे निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

(१८) * ५२८४ श्री.अरुण लाड : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील हर घर जल अर्थात जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गतची कामे निधी अभावी बंद असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेसाठी पुरेशा प्रमाणात निधी देऊन हर घर जल अर्थात जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गतची प्रलंबित कामे सुरू करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गुलाबराव पाटील : (१) अंशत: खरे आहे.

सांगली जिल्ह्यात जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेच्या एकूण ६८३ योजना मंजूर असून ३९१ योजना पूर्ण करुन कार्यान्वित केल्या आहेत. उर्वरित २९२ योजनांपैकी ६२ योजनांची कामे प्रत्यक्षात सुरु असून २३० योजनांची कामे कंत्राटदारांनी निधी अभावी बंद ठेवली आहेत. तसेच थकीत देयकासाठी रुपये २८.०० कोटी इतक्या रक्कमेची मागणी सांगली जिल्हा परिषदेकडून करणेत आलेली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सांगली विभागातील २८ योजनांपैकी २७ योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) जल जीवन मिशन अंतर्गत ऑक्टोबर, २०२४ पासून केंद्र शासनाचा हिस्सा अद्याप प्राप्त झालेला नाही. त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. तथापि, केंद्र शासनाचा हिस्सा अप्राप्त असताना सन २०२५-२०२६ मध्ये मध्ये रुपये १८६३.२५ कोटी इतका निधी अंमलबजावणी यंत्रणेस वितरीत केला आहे.

त्यापैकी दिनांक १७/१०/२०२५ रोजी सांगली जिल्हा परिषदेस राज्य हिश्श्याचा रुपये १५.६९ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, सांगली यांना राज्य हिश्श्याचा रुपये ८.१६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्हा परिषदेतंर्गत रस्त्यांच्या कामांमध्ये दुबार देयके सादर करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

(१९) * **४७९२ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील एकूण १८७ रस्त्यांच्या दुरुस्तीचा प्रस्ताव अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर, तसेच जिल्हाधिकारी, पालघर यांनी शासनाकडे सादर करून रुपये ९२.१९ कोटी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी शासनाकडे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामविकास विभागाच्या दिनांक १९ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार एकूण ७९ रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी रुपये २२.३५ कोटी किंमतीच्या कामांकरीता सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामधील तरतुदीमधून जिल्हा परिषद, पालघर यांना शासनाने निधी उपलब्ध करून दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने मंजूर केलेल्या ७९ पैकी १० रस्त्यांची कामे शासनाच्या विविध योजनेतून यापूर्वीच मंजूर करण्यात आली असून या १० कामांचा देखभाल दुरुस्ती कालावधी (DLP) संपलेला नसल्याची तसेच सदरहू मंजूर कामांची स्थळ पाहणी न करताच दुबार बोगस देयके अदा करण्यात येत असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०२ सप्टेंबर, २०२४ व १९ सप्टेंबर, २०२४ रोजी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर तक्रारींच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करून जिल्हा परिषद, पालघर येथील रस्त्यांच्या कामांमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या दोषी अधिकारी व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयकुमार गोरे : (१), (२), (३) व (४) सन २०२३-२४ मध्ये अतिवृष्टी व पूरहानी कार्यक्रमांतर्गत रुपये ९२.१९ कोटी रक्कमेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषद, पालघर यांनी शासनास सादर केला होता.सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने दिनांक १९/०८/२०२४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे रुपये २२.३५ कोटी रक्कमेच्या रस्ते दुरुस्तीच्या ७९ कामांना प्रशासकीय मान्यता दिली होती.

जिल्हा परिषद, पालघर यांनी सदर ७९ कामांपैकी १० कामे अन्य योजनेंतर्गत मंजूर असल्याने सदर कामे बदलून देणेबाबत दिनांक १७/१२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने दिनांक २६/०६/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषद, पालघर यांना मंजूर असलेली सर्व ७९ कामे रद्द केली आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद, पालघर यांचेमार्फत सदर कामांच्या निविदादेखील रद्द करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे दुबार देयके अदा करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात गिग क्षेत्रातील खाजगी कंपन्यांतील कर्मचाऱ्यांना कायदेशीर संरक्षण व विविध सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

(२०) * ४७४७ श्री.सत्यजीत तांबे, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १४८ ला दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात 'स्विगी', 'झोमॅटो', 'ओला', 'उबर' आदी गिग आधारित प्लॅटफॉर्मवर काम करणारे डिलिव्हरी बॉय, राइडर, ड्रायव्हर, पार्टनर यांना सामाजिक सुरक्षा, विमा संरक्षण, अपघात विमा, विश्रांती वेळ, उत्पन्न हमी, आणि वैद्यकीय सवलती अशा मूलभूत सुविधा मिळत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्रात सध्या अंदाजे ४० लाख गिग वर्कर्स कार्यरत असून त्यांच्याकडे ओळखपत्र, विमा, निवृत्तीलाभ यासारखी कोणतीही हमी नाही अशा परिस्थितीत त्यांच्या कल्याणासाठी स्वतंत्र कायदा/धोरण करण्याची घोषणा राज्य शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२५ मध्ये केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गिग वर्कर्सचे श्रम कायद्यात स्थान निश्चित नसल्यामुळे त्यांना स्थायी हक्कांपासून वंचित रहावे लागत असून त्यांच्या सेवाशर्तींचे कोणतेही नियम निश्चित नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या गिग कामगारांबाबत इतर राज्यांच्या तुलनेत स्वतंत्र धोरण जाहीर केले आहे काय, असल्यास, सदर धोरणाच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे तसेच गिग वर्कर्ससाठी स्वतंत्र कायदा करण्याच्या घोषणेनंतर त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर : (१), (२), (३) होय, हे अंशत: खरे आहे.

(४) गिग कामगारांचे प्रतिनिधी, गिग क्षेत्रातील संबंधित कंपन्या आणि या क्षेत्रातीलत तज्ज्ञ व्यक्तींशी चर्चा करून, गिग कामगारांबाबत धोरण तसेच याबाबत कायद्याचे प्रारूप तयार करण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावरून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

उंबरमाळी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

(२१) * ५९२३ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उंबरमाळी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे स्मशानभूमीकडे जाण्यासाठी पक्का रस्ता नसल्याने ग्रामस्थांना मृतदेह खांद्यावरुन नेत घनदाट जंगल आणि ओढा पार करुन न्यावा लागत असून मागील अनेक वर्षांपासून उंबरमाळी गावासाठी पक्की स्मशानभूमी आणि रस्ता बांधून द्यावा अशी मागणी ग्रामस्थ सातत्याने करुनही याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर तालुका आदिवासी तालुका म्हणून ओळखला जात असून आदिवासी बहुल भाग असल्याने हा जिल्हा १०० टक्के पेसा क्षेत्र असूनही येथील नागरिकांना रस्ता, पाणी आणि वीज यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मौजे उंबरमाळी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे नागरिकांसाठी पक्की स्मशानभूमी आणि रस्ता बांधून देण्याकरीता तसेच इतर सोयी सुविधा देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयकुमार गोरे : (१) नाही, हे खरे नाही.

उंबरमाळी हे गाव ग्रामपंचायत शिरोळ (ता.शहापूर जि.ठाणे) या ग्रामपंचायतीअंतर्गत असून या गावातील स्मशानभूमी सुस्थितीत आहे. सदर स्मशानभूमीला जाण्यासाठी ओढा नसून पक्का पोहच काँक्रीट रस्ता तयार करण्यात आलेला आहे. तसेच, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात जनसुविधा योजनेंतर्गत निवारा शेड मंजूर असून सदरचे काम प्रगतीपथावर आहे.
(२) अंशत: खरे आहे.

तालुका शहापूर जि.ठाणे हा आदिवासी बहुल असून १०० टक्के पेसा आहे. सदर तालुक्यामध्ये ९८ वाड्यापाड्यांना पक्के रस्ते नसल्याचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर यांना कामाच्या तपशिलासह निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले आहे.
(३) मौजे उंबरमाळी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे नागरिकांसाठी स्मशानभूमी आणि पोहच रस्ता उपलब्ध आहे. तथापि, ग्रामपंचायत शिरोळ अंतर्गत उंबरमाळी गावालगत आदिम (कातकरी) समाजाची नवीन वस्ती १ वर्षापासून वसलेली आहे. या वस्तीला गावठाण मंजूर होण्यासाठी ३/२ चा प्रस्ताव वन विभागास सादर केलेला आहे. तसेच, या वस्ती पासून उंबरमाळी स्मशानभुमी अंदाजे ५०० मीटर अंतरावर असून सदर वस्तीसाठी वनदावा मंजूर झाल्यानंतर वस्तीसाठी सोयी सुविधा पुरविणे शक्य आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

भंडारा जिल्ह्यातील तुमसर एमआयडीसी पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याबाबत

(२२) * ६२०१ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यातील तुमसर-गोंदिया राष्ट्रीय महामार्गालगत तीस वर्षापूर्वी स्थापन झालेली एमआयडीसी अद्यापही पूर्ण क्षमतेने सुरू झाली नसल्याने व अपेक्षित उद्योग आणि रोजगारनिर्मिती न झाल्याने परिसरातील औद्योगिक विकास होऊ शकला नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एमआयडीसीसाठी शेतकऱ्यांनी दिलेल्या जमिनीत तीन वर्षात उद्योग सुरू करणे अनिवार्य असतानाही सदर जागेवर अद्याप उद्योग सुरु न झाल्याने, सदर भूखंड पुन्हा शेतकऱ्यांना देण्यात येणार आहेत काय,

(३) असल्यास, तुमसर-गोंदिया राष्ट्रीय महामार्गालगत एमआयडीसी पूर्ण क्षमतेने सुरु करुन उद्योग आणि रोजगारनिर्मिती करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत : (१) व (२) हे खरे नाही.

तुमसर औद्योगिक क्षेत्राकरीता मौजा देव्हाडी येथील १०.३१ हे.आर. जागेचा रितसर ताबा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास प्राप्त झालेला आहे. सदरहू जागेमध्ये एकूण २४ भूखंड आरेखित करण्यात आले असून, सर्व भूखंडांचे वाटप गरजू उद्योजकांना प्रस्तावित उद्योगांसाठी करण्यात आलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना जमीन परत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) तुमसर औद्योगिक क्षेत्रातील वाटप केलेल्या एकूण २४ भूखंडापैकी २० भूखंडावर उद्योग घटक सुरु आहेत. सदर औद्योगिक क्षेत्रात उत्पादन सुरु असलेल्या उद्योग घटकांमध्ये एकूण ३४५ लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. ज्या भुखंडावर उत्पादन बंद आहे अशा भूखंड धारकांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत नोटीस निर्गमित करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

महाळुंगे, चाकण (जि.पुणे) येथील औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. २ मधील वाहनतळाचा वापर खाजगी माल साठविण्याकरीता होत असल्याबाबत

(२३) * ६२६७ श्री.योगेश टिळेकर : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाळुंगे, चाकण (जि.पुणे) औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. २ मधील भूखंड क्रमांक एएम २/२, एचपी चौक ते सावरदरीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत, जवळपास २,५०० चौरस मीटर जागेत एमआयडीसीने कच्चा-पक्का माल घेऊन येणाऱ्या अवजड वाहने, ट्रक आणि ट्रेलर पार्किंगसाठी लाखो रुपयांचा खर्च करून वाहनतळ उभारले असून या वाहनतळावर वाहनांऐवजी खाजगी कंपनीचा माल साठविण्यात येत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वाहनतळाची देखभाल करण्यासाठी नेमलेल्या ठेकेदाराने या वाहनतळाचा अर्धा भाग विभाजीत करुन वाहनांचे पार्कींग करण्यासाठी तर अर्ध्या जागेवर एका खाजगी कंपनीचे साहित्य साठविण्यासह इतर व्यावसायिक वापरास दिला असल्याने वाहनतळावर पार्किंगसाठी अडचण निर्माण झाली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन, चौकशीच्या अनुषंगाने वाहनतळावर पार्किंगच्या समस्याचे निराकरण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली तसेच याप्रकरणी दोषी ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

श्री.उदय सामंत : (१) व (२) होय हे खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. २ मधील भूखंड क्र. AM-२/२ मध्ये सुमारे २५००० चौ.मी. क्षेत्रावर वाहनतळ विकसित केले आहे. सदर वाहनतळावर कार्गो ट्रक-२१, सेमी ट्रेलर-७३, मल्टीएक्सल ट्रेलर-९ अशी एकूण १०३ वाहन पार्किंगसाठी व्यवस्था करण्यात आली आहे. सदर वाहनतळ मे.सागर रोडवेज या ठेकेदारास करारनामा क्र. Gen-१ सन २०२२-२३ अन्वये ५ वर्षासाठी चालविण्यास देण्यात आले आहे.

सदर वाहनतळावर काही भागामधे वाहनाव्यतिरिक्त वस्तु /साहित्य ठेवल्याचे आढळून आले आहे.

(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या दिनांक २३/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये, स्थानिक पोलिसांना रस्त्यावर उभ्या राहणाऱ्या वाहनांना वाहनतळ वापर करण्याची सूचना देण्याची विनंती करण्यात आलेली आहे. तसेच उक्त प्रकरणी करारनाम्यानुसार दिनांक ३१/१०/२०२५ व ०६/११/२०२५ च्या पत्रान्वये, नोटीस देऊन ठेकेदाराकडून खुलासा मागविण्यात आला आहे. त्याचप्रमाणे तातडीने वाहनाव्यतिरीक्त असलेल्या वस्तु/ साहित्य हटविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सदर ठेकेदारामार्फत वस्तु / साहित्य हटविण्यात येत आहेत.

तसेच अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून दिनांक २७/११/२०२५ पत्रान्वये वाहनांव्यतीरीक्त ठेवलेल्या वस्तु / साहित्य याकरीता दुप्पट दराने दंड आकारणी करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शासकीय रुग्णालयांतील ‘ई-संजीवनी’ या ऑनलाईन सेवेमधील तांत्रिक अडचणी दूर करण्याबाबत

(२४) * ६३४५ डॉ.परिणय फुके : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय रुग्णालयांत राबविण्यात येणाऱ्या ‘ई-संजीवनी’ या ऑनलाईन ओपीडी सेवेच्या माध्यमातून रुग्णांना मोफत वैद्यकीय सल्ला दिला जाण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. परंतु या ऑनलाईन सेवेमध्ये अनेक ठिकाणी ॲपवर नोंदणी न होणे, टोकन न मिळणे, तर काही वेळा सत्रच सुरू न होणे अशा तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने सदरहू सेवा बंद असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ई-संजीवनी’ या ऑनलाइन ओपीडी सेवेमध्ये अशा समस्यांमुळे रुग्णांना वैद्यकीय सल्ला व उपचारांपासून वंचित रहावे लागत असून उपचारासाठी रुग्णांना अन्यत्र जावे लागत असल्यामुळे रुग्णांचा वेळ व आर्थिक खर्चही वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ‘ई-संजीवनी’ सेवा अखंडित सुरू ठेवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश आबिटकर : (१) ई-संजीवनी ओपीडी अप्लिकेशनमध्ये माहे ऑक्टोबरमध्ये काही तांत्रिक अडचणी येत होत्या कारण की केंद्र शासनाने दिलेल्या आदेशानुसार CDAC, मोहाली ई-संजीवनी अप्लिकेशनमध्ये “Auto Assign” ऑप्शन व इतर काही सुविधा अप्लिकेशनमध्ये नव्याने सुरु करण्यासाठी काम करत होते, त्यामुळे ऑक्टोबर मध्ये अप्लिकेशनमध्ये तांत्रिक अडचणी काही काळासाठी येत होत्या. परंतु, यामुळे ई-संजीवनी ओपीडी सेवा बंद झाली नव्हती.
(२) हे खरे नाही.

ई-संजीवनी ओपीडी सेवेअंतर्गत रुग्ण थेट डॉक्टरांशी संवाद साधू शकतात या सेवेव्यतरिक्त आयुष्मान आरोग्य मंदिर कार्यक्रमांतर्गत राज्यात टेलिकन्सलटेशन सेवा सर्व उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, नागरी आयुष्मान आरोग्य मंदिर अंतर्गत सुरु आहे.
(३) प्रश्नच उद्भवत नाही.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

राज्यातील विशेषत: पालघर जिल्ह्यातील बालकांच्या कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

(२५) * ६३९४ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सदाशिव खोत : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बालकांच्या कुपोषणाचे प्रमाण कमी व्हावे तसेच बालमृत्यू होऊ नयेत याकरीता शासनाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत असतानाही पालघर जिल्ह्यात माहे एप्रिल, २०२५ ते ऑगस्ट, २०२५ अखेरपर्यंत ० ते ५ वर्षे वयोगटातील ११२ बालमृत्यू व २६९ बालके दूर्धर आजाराने ग्रस्त असून ६८ बालके तीव्र कुपोषित तर ८३५ बालके मध्यम कुपोषित अशी एकूण ९०३ बालके कुपोषणाच्या श्रेणीत असल्याची गंभीर बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निर्दशनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत जिल्हा प्रशासनाने गर्भवती व स्तनदा माता तसेच बालकांसाठी पोषण आहाराच्या विविध योजना राबविण्याबाबत तसेच जिल्ह्यातील बालमृत्यू बरोबरच माता मृत्यूचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करून बालकांपर्यंत आरोग्य सेवा पोचविण्याकरीता जनजागृती करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे : (१) केंद्र शासनाने पोषण ट्रॅकर हे ॲप्लिकेशन विकसित केले असून त्यामध्ये अंगणवाडी सेविकांकडून लाभार्थी बालकाचे वजन व उंची याबाबतची माहिती दरमहा भरण्यात येते. सदर माहितीच्या आधारे लाभार्थी बालकांचे सर्वसाधारण, अतितीव्र कुपोषित (SAM), मध्यम कुपोषित (MAM) अशा पोषण विषयक श्रेणीमध्ये वर्गीकरण करण्यात येते. पोषण ट्रॅकरनुसार पालघर जिल्ह्याची स्थिती खालीलप्रमाणे आहे.:-

कालावधी	एकूण वजन व उंची घेतलेली बालके	तीव्र कुपोषित बालके (SAM)	%	मध्यम कुपोषित बालके (MAM)	%
एप्रिल २५	१३८५३०	४७३	०.३४	३५५६	२.५७
मे २५	१३६४७९	४९१	०.३६	४०२८	२.९५
जून २५	१३८२७८	४८०	०.३५	३८७९	२.८१
जुलै २५	१३४८४७	३६१	०.२७	३२६८	२.४२
ऑगस्ट २५	१३६३८८	३२४	०.२४	२८७८	२.११
सप्टेंबर २५	१३५८९९	३०३	०.२२	२७९४	२.०६
ऑक्टोबर २५	१३४३६२	३०३	०.२३	२६६३	१.९८

वरील माहितीनुसार कुपोषणाचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसून येत आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार एप्रिल,२०२५ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीमध्ये पालघर जिल्ह्यामध्ये जंतुसंसर्ग, न्यूमोनिया, अतिसार, श्वसनाचे विकार, Measels इ. कारणांमुळे ० ते ५ वर्षे वयोगटातील ११२ बालमृत्यू झाले आहेत.

(२) कुपोषण व बालमृत्यू कमी करण्याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात:-

१) एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर महिला व स्तनदा माता यांना THR तर ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

२) तसेच, आदिवासी प्रकल्पामध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु असून ह्या योजनेंतर्गत गरोदर महिला व स्तनदा माता यांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो. तसेच, ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ दिवस अंडी/केळी देण्यात येतात. या ४ दिवसांमध्ये शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी तर मांसाहारी बालकांना प्रति दिन १ अंडे देण्यात येते.

३) तसेच, राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम/नागरी बालविकास केंद्र सुरु करण्यात आलेली आहेत. ग्राम/नागरी बालविकास केंद्रामध्ये सॅम बालकांना तीन वेळा Energy Dense Nutritious Food चा पुरवठा करण्यात येतो तसेच आवश्यकतेनुसार औषधोपचार करण्यात येतो.

४) राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन (ILA) समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT-RTM) व जनआंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

५) गरोदर महिला तसेच बालकांची नियमित आरोग्य तपासणी

६) संस्थात्मक प्रसुती

७) दर ६ महिन्यांनी सर्व बालकांना जंतनाशकाची गोळी व ‘अ’ जीवनसत्वाचा डोस देण्यात येतो.

८) घरच्या घरी नवजात शिशु / बाळाची काळजी (HBNC / HBYC) - या मध्ये आशा सेविका गृहभेटी देतात.

९) अतिजोखमीच्या मातांता आवश्यकतेनुसार औषधोपचार, समुपदेशन,

१०) नियमित लसीकरण

११) प्रसुती पश्चात माता आरोग्य आणि शिशु काळजी समुपदेशन इत्यादी.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

बृहन्मुंबई व नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील आशासेविका व आरोग्यसेविकांची रिक्त पदे भरण्याबाबत

(२६) * ५७८२ श्री.संदीप जोशी, श्री.संजय केणेकर, श्री.वसंत खंडेलवाल, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.सचिन अहिर : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत नागरिकांना वस्तीपातळीवर मूलभूत आरोग्यसेवा पुरविण्याऱ्या महिला आरोग्य सेविकांच्या सद्य:स्थितीत मंजूर ९ हजार २७५ पैकी सुमारे ५००० पदे रिक्त असल्यामुळे दोन ते तीन सेविकांचे काम एकट्या सेविकेकडून करून घेतले जात असल्याचे तसेच मुंबई प्रमाणेच नागपूर महानगरपालिके अंतर्गत कार्यरत सुमारे ११०० आशा सेविकांचे मागील ८ महिन्यांपासून मानधन देण्यात आले नसल्याने त्यांना दिनांक ३ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास व्हेरायटी चौकात आंदोलन केल्याचे माहे आक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत महिला आरोग्यसेविका व आशा सेविका यांची एकूण किती पदे मंजूर आहेत व त्यापैकी किती पदे रिक्त आहेत,

(३) असल्यास, सदर सेविकांच्या रिक्त पदांची भरती करण्यासाठी व त्यांच्या कार्यभाराचे योग्य विभाजन करण्यासाठी तसेच त्यांना मानधन अदा करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश आबिटकर : (१) मुंबई शहरात साधारणपणे ५००० इतक्या महिला सेविका/आशा सेविकांची आवश्यकता आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन विभागातंर्गत महिला आरोग्य स्वयंसेविका तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियांनातंर्गत आशा सेविका अशी एकूण ५०४२ पदे असून त्यापैकी ४६२८ पदे भरलेली आहेत.

नागपूर भागात आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन यांनी आंदोलन केले होते. सदर आंदोलन ऑनलाईन कामांच्या विरोधात करण्यात आले होते.

राज्य शासनाकडील आशा स्वयंसेविकांचे मानधन ऑक्टोबर, २०२५ पर्यंत अदा करण्यात आले असून नोव्हेंबर २०२५ चे मानधन अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

नागपुर महानगरपालिकेत सद्य:स्थितीत ७०० आशा स्वयंसेविकांना स्पर्श प्रणालीव्दारे सप्टेंबर २०२५ पर्यंतचा केंद्र शासनाचा मोबदला अदा करण्यात आला असून उर्वरित ३९९ आशा स्वयंसेविकांचा सप्टेंबर २०२५ पर्यंतचा मोबदलास्पर्श प्रणालीमध्ये क्लेम करण्यात आला आहे.

(२) बृहन्मुंबई - महिला आरोग्य सेविका व आशा सेविका यांचा तक्ता खालीलप्रमाणे

पदाचे नाव	एकूण	कार्यरत	रिक्त
महिला आरोग्य स्वयंसेविका	२६३४	२२२५	४०९
महानगरपालिका आशा	१६८३	१६८३	०
आशा सेविका (NUHM)	७२५	७२०	५
एकूण	५०४२	४६२८	४१४

(३) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात आवश्यक असलेल्या एकूण ५०४२ पदापैकी ४६२८ पदे भरलेली असून ४१४ पदे रिक्त आहेत.

महिला आरोग्य स्वयंसेविका, महानगरपालिका आशा यांना महानगरपालिकेमार्फत वेळेत मानधन अदा करण्यात येते.

राष्ट्रीय आरोग्य अभियांनातंर्गत आशा सेविकांना स्पर्श प्रणालीव्दारे सप्टेंबर, २०२५ पर्यंतचा केंद्र शासनाचा मोबदला अदा करण्यात आला आहे. तसेच राज्य शासनाकडील मानधन ऑक्टोबर, २०२५ पर्यंत अदा करण्यात आले असून नोव्हेंबर २०२५ चे मानधन अदा करणेसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जळगाव जिल्ह्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गतची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(२७) * ५२६४ श्री.एकनाथराव खडसे : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यात गेल्या वर्षभरात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत ५६२ कि.मी.च्या रस्त्यांची ७८ कामे पूर्ण झाली असून उर्वरित १७५ कामे ही निधी अभावी प्रलंबित असून त्यातील व्हाईट टॉपिंगची (डांबरी रस्त्यावर पोर्टलँड सिमेंट कॉंक्रीटचा थर टाकणे) ६८ कामे अपूर्ण असल्याचे दिनांक १ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्हाईट टॉपिंगच्या ६८ कामांसाठी ५२५ कोटी रुपयांची प्रशासकीय मंजूरी असून ५४ कोटींचा निधी आतापर्यंत खर्च झालेला असतानाही अद्याप पर्यंत एकही काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जळगाव जिल्ह्यातील रस्त्यांची प्रलंबित कामे पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयकुमार गोरे : (१), (२) व (३) जळगांव जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ मधील विविध स्त्रोतांतर्गत एकूण १२६७.३६ किमी लांबीच्या २५३ कामांना मान्यता देण्यात आली होती. त्यापैकी ५६२.९० किमी लांबीची ७८ कामे पूर्ण झाली असून उर्वरीत १७५ कामे प्रगतीत आहेत. तथापि, निधी

अभावी अद्याप पर्यंत एकही काम प्रलंबित नाही. सदरील कामांना माहे ऑक्टोबर-२०२४ मध्ये कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आलेले असून मुदतीत दिनांक ०७/१०/२०२६ पर्यंत कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. तसेच व्हाईट टॉपिंगची एकूण ६८ कामे मंजूर असून त्यातील ५५ कामांना माहे ऑक्टोंबर-२०२४ मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आले असून सदर कामे प्रगतीत आहेत. सदर कामे मुदतीत दिनांक २६/१०/२०२६ पूर्वी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. उर्वरित १३ कामांची मुदत दिनांक ०२/०९/२०२७ पर्यंत आहे. सदर कामांना माहे सप्टेंबर-२०२५ मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आलेला असून कामांची मुदत दिनांक ०२/०९/२०२७ पर्यंत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील कामगारांच्या कामाच्या तासांमध्ये बदल करण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत

(२८) * ५७११ श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके, श्री.अरुण लाड : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने मंत्रिमंडळाच्या दिनांक ३ सप्टेंबर, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत कारखाने अधिनियम, १९४८ मधील काही तरतुदींमध्ये बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, यामध्ये कारखाना कायद्यामध्ये बदल करून कामाचे आठ तास ऐवजी बारा तास केले असून, या निर्णयामुळे कंपनी मालकांना फायदा होणार असला तरी कामगारांवरती अन्याय होणार आहे याबाबत विविध कामगार संघटनांनी कामाचे तास पूर्वीप्रमाणेच ठेवण्याची मागणी केली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कायद्यातील ही लवचिकता उद्योजकांना फायद्याची ठरेल पण त्याचा लाभ कामगारांना काहीच होणार नसल्याने कामगारांचे हित लक्षात न घेता त्यांचे मानसिक-शारीरिक शोषण करणारा हा निर्णय असून हा निर्णय रद्द करण्याकरीता व कामगारांवर अन्याय होणार नाही याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

अॅड. आकाश फुंडकर : (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक ३ सप्टेंबर, २०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत कारखाने अधिनियम, १९४८ मध्ये सुधारणा करुन दैनंदिन कामाचे तास आठ ते बारा तासांपर्यंत वाढवण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता.तद्नंतर याबाबतचा अध्यादेशाचा मसुदा दिनांक ३०/०९/२०२५ रोजी राष्ट्रपतींच्या मान्यतेकरीता पाठवण्यात आलेला होता.परंतु दिनांक २१/११/२०२५ रोजी केंद्र शासनाने व्यवसायिक सुरक्षा आरोग्य व कामाचे स्थिती संहिता-२०२० लागू केली आहे. या संहितेमध्ये कामगारांच्या दैनंदिन कामाचे तास ८ आणि आठवड्यातील कामाचे तास ४८ तास अशी तरतुद आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेची व्याप्ती वाढवून अंमलबजावणी करणेबाबत

(२९) * ६२७३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेमार्फत पात्र गरजू मुलांच्या शिक्षणासाठी दर महिन्याला रुपये २२५० इतकी आर्थिक मदत अनुज्ञेय असून सदर मदत थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होते परंतु माहे एप्रिल, २०२५ पासून या योजनेतील पात्र लाभार्थी मुलांना सदरहू आर्थिक मदतीचे पैसे त्यांच्या बँक खात्यात जमा झाले नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात एकल महिलांची संख्या ८० लाखांपेक्षा जास्त असून अहिल्यानगर, पुणे, परभणी या जिल्ह्यांच्या सर्वेक्षणात पुणे जिल्ह्यात १ लाख १० हजार, अहिल्यानगरमध्ये १ लाख २० हजार एकल महिला आढळल्या असल्याने ही आकडेवारी बघता राज्य सरकारने एकल महिलांचे प्रत्येक जिल्ह्यात सर्वेक्षण करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात सावित्रीबाई फुले बालसंगोपन या योजनेतील पात्र लाभार्थी मुलांना सदरहू आर्थिक मदतीचे पैसे त्यांच्या बँक खात्यात जमा करणेबाबत तसेच सदर लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) बालसंगोपन योजनेंतर्गत चालू आर्थिक वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीमधून सन २०२४-२५ चे प्रलंबित लाभार्थ्यांचे अनुदान अदा केल्यामुळे चालू आर्थिक वर्षाचे अनुदान अदा करण्यासाठी हिवाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीद्वारे निधी उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील पंचायत समितीमधील कर्मचाऱ्यांनी बनावट स्वाक्षरी करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

(३०) * ६१०२ डॉ.प्रज्ञा सातव : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील पंचायत समितीतील ४ कर्मचाऱ्यांनी ५५ लाख रुपयांचा गैरव्यवहार केला असून याबाबत गुन्हा दाखल करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेनगाव तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या १३ लाख रुपये कर्जाची परतफेड याच रकमेतून केल्याचे निष्पन्न झाले असून संबंधित कर्मचाऱ्यांनी कपातीचे धनादेश वैयक्तिक नावे उचलून घेतल्याचे तसेच धनादेशासाठीच्या कागदपत्रांवर गट विकास अधिकाऱ्यांची बनावट स्वाक्षरी केल्याचा अहवाल चौकशी पथकाने सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी करून संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयकुमार गोरे : (१), (२) व (३) पंचायत समिती औंढा नागनाथ, जि.हिंगोली येथील चार कर्मचाऱ्यांनी शासन कपातीच्या रक्कमा शासन खात्यावर जमा न करता त्रयस्त व्यक्तीच्या बँक खात्यामध्ये वर्ग करून रूपये ५७,५३,७२५/- रकमेचा अपहार केल्याची बाब निदर्शनास आली आहे.

सदर प्रकरणी लेखाधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करून प्रकरणाची चौकशी केली आहे. यामध्ये अपहारीत रकमेतून एका कर्मचाऱ्याने रुपये ११,८०,०००/- पतसंस्थेच्या कर्जाची परतफेड केली आहे. उर्वरित रुपये ४५,७३,७२५/- इतकी रक्कम अन्य व्यक्तिंच्या बँक खात्यावर वर्ग केली आहे.

या प्रकरणी सबंधित सहाय्यक लेखाधिकारी, कनिष्ठ लेखधिकारी, वरिष्ठ सहाय्यक (लेखा) व कनिष्ठ सहाय्यक (लेखा) तथा रोखपाल या ०४ अधिकाऱ्यांना निलंबित करुन त्यांचे विरूध्द विभागीय चौकशीची कारवाई प्रस्तावित केली आहे.

तसेच संबंधित कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करणेबाबत गट विकास अधिकारी पंचायत समिती औंढा नागनाथ यांना जिल्हा परिषदेने दिनांक ०६/१०/२०२५ रोजी कळविले आहे.

अपहारीत रक्कम रूपये ५७,५३,७२५/- पैकी रूपये २२,६३,५२९/- वसुल करण्यात आले असून उर्वरित रक्कम रूपये ३४,९०,१९६/- वसुल करण्याची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील बाल कामगार प्रथा निर्मुलनाकरीता प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत

(३१) * **५६१४ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मुंबई शहर, मुंबई उपनगर, पालघर, रायगड, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे व नागपूर येथे हजारो बाल कामगार काम करीत असून, मागील तीन ते चार वर्षांच्या कालावधीत कामगार विभागाने टाकलेल्या ७८७ छाप्यात अंदाजे ५०० बाल कामगार आढळून आल्याने संबंधित २४८ आस्थापना धारकांवर गुन्हा दाखल करण्यात आल्याची बाब माहे जून, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील बाल कामगार ही प्रथा समूळ नष्ट करण्याच्या अनुषंगाने कामगार विभागामार्फत करण्यात येणाऱ्या कारवायांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ करण्याबाबत तसेच बाल कामगारांना काम करण्यासाठी प्रवृत्त करणारी कारणे शोधून त्यावर उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने व बाल कामगारांना कामावर ठेवणारे संबंधित आस्थापना प्रमुख यांचेवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच शासनाकडून बाल कामगार प्रथा निर्मूलनासाठी कोणत्या मोहिमा, तपासणी पथके किंवा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर : (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात मागील चार वर्षात टाकण्यात आलेल्या १००१ धाडसत्रामध्ये १४ वर्षाखालील ४५३ व १४ ते १८ वर्षातील २५० किशोरवयीन कामगारांना मुक्त करण्यात येऊन संबंधित मालकाविरुध्द ३३३ गुन्हे संबंधित पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आले असून बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ अंतर्गत संबंधिता विरुध्द १२९ खटले दाखल करण्यात आलेले आहेत.

(२) बाल कामगार या अनिष्ठ प्रथेतून मुक्त करण्यासाठी, शासनाने दिनांक ०२/०३/२००९ रोजीचा शासन निर्णय निर्गमित केला असून, त्याद्वारे विविध विभागांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली कृतीदलाची स्थापना करण्यात आली असून कृतीदलाची नियमितपणे बैठक घेतली जाते. कृतीदलाच्या माध्यमातून धाडसत्राचे आयोजन करण्यात येते.

दरवर्षी दिनांक १२ जून हा दिवस "जागतिक बाल कामगार प्रथा विरोधी दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. तर दिनांक १४ नोव्हेंबर "बालदिन" या दिवसाचे औचित्य साधून दिनांक १४ ते दिनांक २१ नोव्हेंबर या कालावधीत बाल कामगार प्रथा विरोधी सप्ताह साजरा करण्यात येतो.

बाल कामगार प्रथा समूळ नष्ट करण्याकरीता समाजाच्या सर्व घटकांमध्ये सोशल मिडीया व वृत्तपत्रांमध्ये बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ या अधिनियमाची जनजागृती करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथील विशेषज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रलंबित मानधन देण्याबाबत

(३२) * ५०६१ श्री.संजय खोडके : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथील ६२ विशेषज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांना माहे मे, २०२५ पासून त्यांचे मानधन शासनाकडून न मिळाल्यामुळे त्यांनी आंदोलन सुरू केले असल्याने या भागातील ३०० ते ४०० किडनी रुग्ण, बालरुग्ण, प्लास्टिक सर्जरी व हृदयविकाराशी संबंधित शस्त्रक्रिया होऊ न शकल्यामुळे रुग्णांना नाहक त्रास सहन करावा लागल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेषतज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांना मानधन मिळत नसल्यामुळे सुरु असलेल्या आंदोलनामुळे रुग्णांची गैरसोय होत असून, रुग्णांच्या शस्त्रक्रिया व उपचार व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी शासनाने कोणती पर्यायी व्यवस्था केली वा करण्यात येत आहे तसेच सदर विशेषज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांना तात्काळ मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश आबिटकर : (१) हे अंशत: खरे आहे.

काही शस्त्रक्रिया विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथील पुढे ढकलाव्या लागल्या परंतु गंभीर रुग्णांना रुग्णवाहिकांद्वारे पुढील उपचारासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे संदर्भित करण्यात आले. तसेच संप संपल्यानंतर काही रुग्णांना रुग्णालयीन दुरध्वनीद्वारे संपर्क करुन त्यांच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

(२) विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथील कंत्राटी विशेषज्ञांचे माहे जुलै, २०२४ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आलेले होते. माहे ऑगस्ट, २०२४ ते माहे डिसेंबर, २०२४ पर्यंतचे मानधन माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये अदा केलेले आहे. मात्र माहे जानेवारी, २०२५ ते आजतागायत मानधनासाठी लागणारा आवश्यक निधी पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय येथील विशेषज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांचे सुरु असलेले आंदोलन हे माहे डिसेंबर, २०२४ पर्यंतचे मानधन अदा करण्यात आल्याने तसेच शासन निर्णय दिनांक १८ सप्टेंबर, २०१० मध्ये निश्चित करण्यात आलेल्या सुप्रामेजर, मेजर व मायनर दरामध्ये वाढ करण्याकरीता शस्त्रक्रियांच्या दरांमध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन विचाराधीन असल्याने, विशेषज्ञांनी दिनांक २७/०९/२०२५ रोजी संप मागे घेतलेला आहे. सद्य:स्थितीत रुग्णालयातील आरोग्य सेवा सुरळीत सुरु आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही

ढेबेवाडी (ता.पाटण, जि.सातारा) विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे कार्यान्वित करण्याबाबत

(३३) * ६३३३ श्री.शशिकांत शिंदे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ढेबेवाडी (ता.पाटण, जि.सातारा) विभागात तळमावले, सळवे, सणबूर, काळगाव अशी चार प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच कुंभारगाव येथे आयुर्वेदिक केंद्र आणि ढेबेवाडीत ग्रामीण रुग्णालयांची शासनाने कोट्यवधी रुपये खर्च करुन उभारणी केली असतानाही या आरोग्य उपकेंद्रामधील बहुतांश वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी हे त्यांच्या कर्तव्यापासून दूर शहरात वास्तव्य करित असल्याने सदरची उपकेंद्रे बहुतेक वेळा बंद असल्याने रुग्णांना सेवा मिळण्यात अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्र पूर्ण क्षमतेने सुरु करुन येथील गैरहजर असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.प्रकाश आबिटकर : (१) पाटण तालुक्यातील सळवे, सणबूर, तळमावले व काळगाव अशी चार प्राथमिक आरोग्य केंद्रे ढेबेवाडी विभागात कार्यरत आहेत. उपरोक्त प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांची सर्व पदे भरलेली आहेत. तसेच आरोग्य कर्मचारी यांची ८० टक्के पेक्षा जास्त पदे भरलेली आहेत. सदर भाग दुर्गम व डोंगराळ असून त्या ठिकाणी सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी राहून रुग्ण सेवा देत असल्याबाबतचा अहवाल तालुका आरोग्य अधिकारी ता.पाटण, जि.सातारा यांनी सादर केलेला आहे. सदरील विभागातील नागरीकांना अत्यावश्यक आरोग्य सेवा उपलब्ध होत आहेत. तसेच ग्रामीण रुग्णालय ढेबेवाडी ता.पाटण येथील २७ मंजूर पदांपैकी २२ पदे भरलेली आहेत. भरलेल्या पदांपैकी सर्व अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी रहात असून २४ तास रुग्ण सेवा देत आहेत.

(२) वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी गैरहजर राहतात अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात एकात्मिक बालविकास प्रकल्प अंतर्गत लाभार्थी चेहरा प्रमाणीकरण यंत्रणेतील तांत्रिक अडचणी दूर करण्याबाबत

(३४) * **४७५१ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत अंगणवाड्यांमधून पोषण आहार वाटप करताना सध्या 'लाभार्थी चेहरा प्रमाणीकरण' (FRS) पध्दतीने लाभार्थ्यांची ओळख पटवून त्यांची नोंद करण्याची योजना सुरू करण्यात आली असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर 'लाभार्थी चेहरा प्रमाणीकरण' (FRS) पध्दत तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण नसल्याने अंगणवाडी सेविकांना तांत्रिक अडचणी निर्माण होत असून त्यामुळे आहार वाटपाच्या प्रक्रियेस विलंब होत आहे तसेच मानसिक ताणही सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, 'लाभार्थी चेहरा प्रमाणीकरण' (FRS) पध्दतीमुळे निर्माण झालेल्या समस्या आणि त्यांच्या कारणांची चौकशी करुन अंगणवाडी सेविका आणि लाभार्थ्यांना येत असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे : (१) हे खरे आहे,

एकात्मिक बालविकास सेवा या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर महिला व स्तनदा माता व आकांक्षित जिल्ह्यामधील किशोरवयीन मुलींना घरपोच आहार (THR) पुरवला जातो.

लाभार्थी चेहरा प्रमाणीकरण (FRS) प्रक्रियेद्वारे घरपोच आहार वाटपाची सुविधा केंद्र शासनाद्वारे पोषण ट्रॅकर अँपमध्ये "ऑक्टोबर-२०२४" पासून सुरू करण्यात आली होती आणि दिनांक १ जुलै, २०२५ पासून ही सुविधा सर्व राज्यांसाठी बंधनकारक करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाच्या सुचनेनुसार FRS नुसार लाभार्थ्यांना पूरक पोषणाचा लाभ देणे आवश्यक आहे. त्यामुळे, सर्व लाभार्थ्यांची FRS ची १००% नोंद पोषण ट्रॅकरवर होणे आवश्यक आहे

(२) व (३) सुरवातीच्या कालावधीत FRS च्या नोंदी घेताना तांत्रिक अडचणी आल्या होत्या. तथापि, सदर अडचणी सोडवून FRS च्या नोंदी लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी FRS (Facial Recognition System) प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी प्रकल्प क्षेत्रात आधार नोंदणी शिबिरे आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे FRS करीता येणाऱ्या तांत्रिक अडचणी विचारात घेऊन खालीलप्रमाणे सूविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत:-

१) THR वाटप करताना चेहरा जुळल्यानंतर "OTP" ची आवश्यकता नाही. केवळ चेहरा प्रमाणीकरण द्वारे घरपोच आहार वाटप करण्याची सुविधा आहे.

२) आधीचा सत्यापित फोटो व्यवस्थित नसेल आणि त्यामुळे लाभार्थी यांचा चेहरा THR वाटप करत असताना जुळत नसेल तर पुन्हा फोटो काढण्याची आणि सत्यापित करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

३) सुरवातीला लाभार्थी यांना चेहरा प्रमाणीकरण प्रक्रियेमध्ये ऑनबोर्ड करण्यासाठी Ekyc करून फोटो काढणे आवश्यक आहे आणि त्यासाठी इंटरनेट सुविधेची एकदा गरज आहे. तदनंतर घरपोच आहार देताना लाभार्थी यांचा चेहरा प्रमाणीकरण करताना इंटरनेटची आवश्यकता नाही ही सुविधा विना इंटरनेट देखील उपलब्ध आहे. मात्र ५ दिवसातून हा डेटा एक वेळ Sync करणे आवश्यक आहे.

लाभार्थ्यांना देण्यात येणारा घरपोच आहार नियमितपणे देण्याच्या अनुषंगाने पोषण ट्रॅकर डेटानुसार ९४% लाभार्थ्यांची FRS मध्ये आधार फेस मॅपिंग झालेली असून FRS प्रणालीमध्ये नोंद झालेल्या अथवा अद्याप नोंद न झालेल्या सर्व लाभार्थ्यांना सद्य:स्थितीत वेळेत घरपोच आहार पुरवठा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भंडारा जिल्ह्यातील अंगणवाडी इमारतींची दुरवस्था झाल्याबाबत

(३५) * ६२०२ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यात महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत १२५२ अंगणवाडी केंद्र असून त्यापैकी बऱ्याच अंगणवाडी केंद्रांच्या इमारती अतिशय जुन्या असल्याने त्या जीर्ण झाल्या असून, सद्य:स्थितीत सदर इमारती मोडकळीस आल्या असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मोडकळीस आलेल्या इमारतीमुळे येथे दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याने भंडारा जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्यांची आवश्यक तेथे दुरुस्ती किंवा नवीन इमारतीचे बांधकाम करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे : (१) अंशतः खरे आहे.

भंडारा जिल्ह्यामध्ये महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, भंडारा अंतर्गत एकूण १२५२ अंगणवाडी केंद्र कार्यरत असून त्यापैकी ११८२ अंगणवाडी केंद्रांना स्वमालकीची इमारत उपलब्ध आहे. त्यापैकी २३४ अंगणवाडी केंद्रांच्या इमारती जुन्या व जीर्ण स्थितीत होत्या.

(२) जुन्या व जीर्ण इमारती असलेल्या अंगणवाडी केंद्रांपैकी जिल्हा वार्षिक विकास योजनेंतर्गत ३३ नवीन अंगणवाडी केंद्र इमारत बांधकाम करण्यात आले आहे. तसेच ८७ अंगणवाडी केंद्र इमारतीची विशेष दुरूस्ती केलेली आहे. १३ वा वित्त आयोग अंतर्गत अभिसरणाद्वारे १४ अंगणवाडी इमारत बांधकाम करण्यात आलेले आहे. तसेच जिल्हा वार्षिक विकास योजना सन २०२५-२६ मध्ये २६ नवीन अंगणवाडी इमारत बांधकाम व ५६ अंगणवाडी केंद्रांची विशेष दुरूस्ती प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सह्याद्री रुग्णालयात (जि.पुणे) यकृत प्रत्यारोपणानंतर दांम्पत्याच्या मृत्यूची चौकशी करण्याबाबत

(३६) * ६२६८ श्री.योगेश टिळेकर : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सह्याद्री रुग्णालयात (जि.पुणे) यकृत प्रत्यारोपणानंतर दांम्पत्याचा मृत्यू होऊन दोन महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही याप्रकरणी जबाबदारी निश्चित करण्याबाबत आरोग्य यंत्रणांकडून विलंब होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि ससून रुग्णालयाने सदर प्रकरणाबाबत एकमेकांकडे जबाबदारी ढकलल्याने या गंभीर प्रकरणाचा निष्पक्ष तपास होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी नेमलेल्या उच्चस्तरीय चौकशी समितीने चौकशी अहवाल शासनाकडे सादर करूनही त्यावर शासनाने कोणताही निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन चौकशीअंती याप्रकरणी दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश आबिटकर : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सदर प्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या आठ सदस्यांच्या तज्ज्ञ समितीने चौकशी अहवालात कोणालाही दोषी ठरविण्यात आले नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य कामगार विमा महामंडळाअंतर्गत नवीन रुग्णालये स्थापन करण्याबाबत

(३७) * ६३६३ डॉ.परिणय फुके : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कामगार विमा योजना (ईएसआयसी) अंतर्गत सुमारे दोन कोटी कामगारांसाठी उच्च दर्जाच्या वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी राज्यात एकूण १९ रुग्णालये उभारण्याचा प्रस्ताव असून त्यासाठी केंद्र शासनाने निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेतून मंजूर करण्यात आलेल्या १९ पैकी केवळ पुणे व सातारा येथील रुग्णालये कार्यरत आहेत आणि उर्वरित मुंबई, नाशिक, नागपूर, ठाणे, औरंगाबाद, चंद्रपूर, नवी मुंबई, पिंपरी-चिंचवड, पनवेल, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, अमरावती इत्यादी ठिकाणी केंद्र शासनाने मंजूरी दिलेली असूनही स्थळ निश्चिती किंवा हस्तांतरण प्रक्रियेत विलंब होत असल्याने रुग्णालयांचे बांधकाम अद्याप सुरू झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विलंबामुळे कोट्यवधी कामगार वर्गाला उपचारासाठी खाजगी रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागते असून, दरवर्षी कामगारांच्या वैद्यकीय खर्चावर आर्थिक भार वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रस्तावित राज्य कामगार विमा योजना रुग्णालयांच्या स्थळ हस्तांतरण, निधी वितरण, मंजुरीनंतरची प्रक्रिया व बांधकाम सुरुवात यासंदर्भात केंद्राशी समन्वय साधून निर्णय घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश आबिटकर : (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांतील संपूर्ण क्षेत्रात राकावि योजना लागू करण्यात आल्यामुळे राज्यात सद्य:स्थितीत एकूण ४९,१४,७९० नोंदणीकृत विमाधारक व १.९६ कोटी लाभार्थी असून, नवीन क्षेत्रातील नोंदणीकृत विमाधारक व लाभार्थींना वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी राकावि महामंडळाने माहे जून,२०२२ पासून टप्याटप्याने राज्यात एकूण १८ नवीन राकावि रूग्णालये उभारण्यास मान्यता दिलेली आहे. सदर १८ रूग्णालयांचे बांधकाम व त्यावरील संपूर्ण खर्च हा राकावि महामंडळामार्फत करण्यात येणार आहे.

तसेच या १८ नवीन राकावि रूग्णालयां व्यतिरिक्त बुटीबोरी, नागपूर येथे नवीन राकावि रूग्णालयाचे बांधकाम राकावि महामंडळामार्फत करण्यात येत आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक २१/११/२०२५ अन्वये १८ नवीन राकावि रूग्णालयांच्या उभारणीसाठी राकावि महामंडळास महसूल मुक्त व सारा माफीने सरकारी जमीन उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने सदर १८ नवीन राकावि रूग्णालयांपैकी एकूण ०७ रूग्णालयांच्या (चाकण, जळगाव, अमरावती, वर्धा, सिन्नर, बारामती व सातारा) जमीनीबाबत राकावि महामंडळामार्फत लीज ॲग्रीमेंट करण्यात येत असून, उर्वरीत ११ रूग्णालयांबाबत (वाळूंज, शेंद्रा, पालघर, कर्जत, पेण, अहिल्यानगर, सांगली, बल्लारपूर, रत्नागिरी, पनवेल व खोपोली) जमीन संपादित करण्याची कार्यवाही राकावि महामंडळाकडून सुरू आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

राकावि योजना लागू केलेल्या नवीन क्षेत्रातील विमाधारकांना व लाभार्थींना वैद्यकीय उपचार उपलब्ध व्हावे, याकरीता महा-राकावि सोसायटीमार्फत सेकंडरी मेडिकल केअर पुरविण्यासाठी एकूण ३०७ खाजगी रूग्णालयांशी केंद्र शासनाच्या आरोग्य योजनेच्या (CGHS) दराने टाय-अप करण्यात आलेले असून, राकावि महामंडळामार्फत अतिविशेषोपचार पुरविण्यासाठी १३६ खाजगी रूग्णालयांमार्फत केंद्र शासनाच्या आरोग्य योजनेच्या (CGHS) दराने टाय-अप करण्यात आलेले आहे. या व्यतिरिक्त विमाधारकांना आपात्कालीन परिस्थितीत जवळच्या खाजगी रूग्णालयात उपचार घेतल्यास झालेल्या खर्चाची वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती करण्यात येते.
(४) केंद्र शासनाच्या उद्योग संवर्धन व आंतरीक व्यापार विभागाच्या “प्रकल्प देखरेख गट” (Project Monitoring Group) पोर्टल अंतर्गत सदर रुग्णालयांच्या उभारणी बाबतच्या बाबींचा समावेश करण्यात आला असून याबाबतचा आढावा वेळोवेळी केंद्र शासनामार्फत घेण्यात येत आहे.

तसेच, राज्य कामगार विमा योजनेंतर्गत नवीन रूग्णालये त्वरेने उभारणीच्या अनुषंगाने दिनांक १६/०७/२०२५ रोजी मा.केंद्रीय कामगार मंत्री यांच्या समवेत बैठक आयोजित करण्यात आली होती.

त्याचबरोबर संबंधित जिल्हाधिकारी, एमआयडीसी तसेच राज्य शासनाच्या संबंधित विभागांशी समन्वय साधून प्रस्तावित राज्य कामगार विमा योजना रूग्णालयांकरीता सुयोग्य जागा संपादित करण्याची आणि जागेचे लीज ॲग्रिमेंट करण्याची कार्यवाही राज्य कामगार विमा महामंडळा मार्फत करण्यात येत आहे.

(५) विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

निंबानी सॉल्ट इंडस्ट्री (ता.जि.पालघर) येथील कंपनीमध्ये झालेल्या स्फोटात मृत व जखमी कामगारांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्याबाबत

(३८) * ६३९६ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर-मनोर रस्त्यावरील पालघर पूर्वेकडील जे.पी. उद्योग नगर परिसरातील निंबानी सॉल्ट इंडस्ट्री या कंपनीमध्ये ॲसिड आणि मेटल पदार्थांची रासायनिक प्रक्रिया सुरू असताना स्फोट होऊन एक कामगार मृत्यूमूखी व दोन कामगार जखमी झाल्याची घटना दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची पुढील चौकशी सुरू असून, औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य संचालनालयाच्या अधिकाऱ्यांचा अहवाल आला नसल्याने याप्रकरणी दोषींवर गुन्हा दाखल करण्यास दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्फोटातील मृत व जखमींच्या कुटुंबियांना औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य संचालनालयाच्या अधिकाऱ्यांचा अहवाल तातडीने प्राप्त करुन घेण्याबाबत तसेच सदर स्फोटातील मृत व जखमी कुटुंबियांना कंपनी व शासनामार्फत आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली तसेच दोषी कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर : (१) हे खरे आहे.

(२) सदर अपघाताची चौकशी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, पालघर यांचेमार्फत करण्यात आलेली असून कारखाने अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ अंतर्गत आढळून आलेल्या भंगाकरीता न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पालघर यांच्या न्यायालयात कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द फौजदारी दाखल करण्यात आलेला आहे.

(३) मयत कामगाराच्या वारसास अपघात नुकसान भरपाई मिळण्यासाठी नुकसान भरपाई आयुक्त तथा कामगार न्यायालय, ठाणे यांना कळविण्यांत आलेले आहे.

तसेच मयत कामगाराच्या वारसास नुकसान भरपाई मिळण्याबाबत कारखाना व्यवस्थापनाने विमा कंपनीकडे दावा दाखल केलेला आहे.

सर्व जखमी कामगारांचा वैद्यकीय उपचाराचा खर्च कारखाना व्यवस्थापनाकडून करण्यात आलेला आहे.

भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून कारखाना व्यवस्थापनास सुरक्षिततेबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील विशेषत: अमरावती व रायगड जिल्ह्यातील स्वच्छ भारत व जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे थकित वेतन अदा करण्याबाबत

(३९) * ५७८७ श्री.संदीप जोशी, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.अमित गोरखे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: अमरावती व रायगड जिल्ह्यातील स्वच्छ भारत व जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत काम करणाऱ्या एक हजारांहून अधिक कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मागील चार महिन्यांपासूनचे वेतन/मानधन त्यांना अदा न करण्यात आल्यामुळे या कर्मचाऱ्यांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा व स्वच्छता मिशन कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागात स्वच्छता, सांडपाणी व्यवस्थापन आणि शौचालय बांधणीसाठी काम करणाऱ्या सदर कर्मचाऱ्यांनी त्यांचे प्रलंबित वेतन तातडीने देण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील विशेषत: अमरावती व रायगड जिल्ह्यातील स्वच्छ भारत व जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत काम करणाऱ्या एक हजारांहून अधिक कंत्राटी कर्मचाऱ्यांचे थकित वेतन मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.गुलाबराव पाटील : (१) अंशतः खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) केंद्र शासनाच्या निर्देशानुसार स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत विविध घटकांवरील खर्चाच्या १ टक्के निधी प्रशासकीय बाबींवरील खर्चासाठी जिल्ह्यांना उपलब्ध करण्यात येतो. स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत जिल्हास्तरावर कार्यरत कंत्राटी मनुष्यबळाचे एप्रिल, २०२५ ते सप्टेंबर, २०२५ या सहा महिन्यांचे मानधन अदा करण्याकरीता जिल्ह्यांना निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

त्याचप्रमाणे, जल जीवन मिशन अंतर्गत विविध स्तरावरील कार्यरत कंत्राटी मनुष्यबळ यांचे मानधन जल जीवन मिशन अंतर्गतच्या पाणी गुणवत्ता घटकाकरीता मंजूर २ टक्के निधीतून व ५ टक्के सहाय्य निधीतून अदा करण्यात येते. याकरीता राज्य शासनाने उपलब्ध केलेल्या निधीतून जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हास्तरावर कार्यरत कंत्राटी मनुष्यबळाचे माहे एप्रिल, २०२५ ते सप्टेंबर, २०२५ या सहा महिन्यांचे मानधन अदा करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

बऊर (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील विकासकामांमधील गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

(४०) * **६१०४ डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बऊर (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील विकासकामांमधील गैरव्यवहारासंदर्भात चौकशी समिती नेमण्यात आलेली होती. सदर समिती गावात चौकशीसाठी न पोहचल्याने नागरिकांचा संताप अनावर झाल्याचे दिनांक ९ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बऊर गावातील अनुसूचित जाती व नवबौध्द वस्ती विकास योजनेंतर्गत मंजूर झालेला निधी इतरत्र वळविण्याचा व विकासकामांमध्ये निकृष्ट दर्जाचे कामकाज केल्याचा आरोप काही राजकीय कार्यकर्त्यांनी केला असून गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेचे बांधकाम हे दर्जाहीन असल्याचा आरोपही करण्यात आला असून याबाबत शासनाने त्वरीत चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयकुमार गोरे : (१) व (२) मौ.बऊर (ता.कळमनुरी जि.हिंगोली) येथील कामांबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, हिंगोली मार्फत दिनांक ०४/०८/२०२५ रोजी चार सदस्यांची समिती गठीत करण्यात आली होती. मौ. बऊर येथील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेंतर्गत सन २०२३-२४ या वर्षात झालेल्या कामाची चौकशी करुन चौकशी समितीने दिनांक ०६/११/२०२५ रोजी अहवाल सादर केला आहे.

तथापि, सदर कामाचा निधी इतरत्र वळविण्यात आलेला नाही. कार्यकारी अभियंता बांधकाम (जि.प.) यांनी संबंधित शाळा बांधकामाची पाहणी केली आहे. सदर शाळा बांधकामाची गुणवत्ता चांगली असल्याचे त्यांनी त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्ह्यातील धोकादायक शाळांच्या वर्गखोल्या निर्लेखित करण्याबाबत

(४१) * **५०७० श्री.संजय खोडके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यात ३२७ शाळा धोकादायक (जिर्ण अवस्थेतील) श्रेणीमध्ये येत असून त्यासाठी आवश्यक निधी मंजूर झाला आहे, मात्र प्रशासकीय स्तरावर अद्यापही धोकादायक (जीर्ण अवस्थेतील) खोल्यांच्या निर्लेखनाची कार्यवाही सुरू झालेली नसल्याचे तसेच तिवसा येथील जिल्हा परिषद मुलांची शाळा, मार्डी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अनकवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तसेच निंभोरा येथील जिल्हा परिषद शाळेतील एकूण आठ वर्गखोल्या धोकादायक अवस्थेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धोकादायक वर्गखोल्यांचे निर्लेखन करण्याचा प्रस्ताव शाळा व्यवस्थापन समितीच्या ठरावासह बांधकाम विभागाकडे सादर करण्यात आला असल्याचे दिनांक ३० जुलै, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धोकादायक वर्गखोल्यांच्या निर्लेखनास वारंवार पाठपुरावा केल्यानंतरही मंजुरी देण्यात आली नसल्याचे गटशिक्षणाधिकाऱ्यांनी सांगितले असून धोकादायक वर्गखोल्यांच्या पाडकामास मान्यता देण्याबाबत शासनास विनंती करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने या ३२७ धोकादायक शाळांच्या वर्गखोल्या निर्लेखित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयकुमार गोरे : (१) अमरावती जिल्ह्यातील शिकस्त झालेल्या एकूण १८३ शाळेतील ३३२ वर्गखोल्यांपैकी २३२ वर्गखोल्यांचे निर्लेखन करण्याची कार्यवाही सुरु असून उर्वरित १०० वर्गखोल्यांचे निर्लेखन प्रस्ताव शिक्षण विभाग व बांधकाम विभागामार्फत प्राप्त झाल्यावर निर्लेखनाची कार्यवाही करण्यात येईल.

तसेच पंचायत समिती तिवसाअंतर्गत जिल्हा परिषद मुलांची शाळा येथील ०४ वर्गखोल्या, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मार्डी येथील ०४ वर्गखोल्या, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अनकवाडी येथील ०२ वर्गखोल्या व जिल्हा परिषद शाळा, निंभोरा येथील ०१ वर्गखोली अशा ०४ शाळेतील वर्गखोल्या धोकादायक असल्याचे माहे सप्टेंबर २०२३ मध्ये निदर्शनास आले असल्याने सदर शाळा वर्गखोल्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन निर्लेखनाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) अमरावती जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेल्या एकूण १८३ शाळेतील ३३२ वर्गखोल्यांपैकी २३२ वर्गखोल्यांच्या निर्लेखनाचे आदेश निर्गमित झाले असून त्याबाबतची कार्यवाही पंचायत समिती स्तरावर सुरु आहे. उर्वरित १०० वर्गखोल्यांचे निर्लेखन प्रस्ताव शिक्षण विभाग व बांधकाम विभागामार्फत प्राप्त झाल्यावर निर्लेखनाची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील खाजगी आस्थापनांमध्ये महिला तक्रार निवारण समिती कार्यान्वित करण्याबाबत

(४२) * **६२९९ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनेक खाजगी कंपन्यांमध्ये "कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ कायदा, २०१३" नुसार १० पेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या सर्व संस्थांना लेखी आदेशाद्वारे एक अंतर्गत तक्रार समिती (ICC) स्थापन करणे बंधनकारक असतानाही बहुतांश कंपन्यामध्ये ही समिती स्थापन करण्यात आलेली नसून केवळ १३३ कंपन्यांमध्येच या समित्या कार्यरत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपन्यांमध्ये कार्यरत महिलांच्या तक्रारींचे निवारण होण्यासाठी योग्य यंत्रणा नसल्यामुळे त्यांना भेदभाव, छळवणूक व असुरक्षिततेचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सर्व खाजगी कंपन्यांमध्ये अंतर्गत तक्रार समित्या कार्यान्वित करण्यासाठी तसेच महिलांच्या सुरक्षिततेसाठी राज्य महिला आयोग व संबंधित विभागांनी अशा कंपन्यांवर कारवाई करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे : (१) हे खरे नाही.

राज्यात ऑक्टोबर, २०२५ अखेर एकूण १,०६,३१८ खाजगी आस्थापनांमध्ये अंतर्गत समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

अंतर्गत समिती स्थापन न झाल्यास पिडीत महिलेला कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवणूकीच्या विरोधात जिल्ह्यातील स्थानिक समितीकडे तक्रार करण्याची सुविधा आहे.

तसेच सदर महिलांना ऑनलाईन तक्रार करण्याकरीता केंद्र सरकारने SHE Box Portal ऑनलाईन तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

(३) याबाबत POSH Act,२०१३ मधील तरतुदीनुसार खाजगी आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार समित्या स्थापन करण्याबाबत आयुक्त, महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे यांचेमार्फत वर्तमानपत्रात निवेदन प्रसिध्द करण्यात आले असून त्यात अंतर्गत समिती स्थापन न केल्यास अधिनियमामधील दंडात्मक तरतुदीही निदर्शनास आणण्यात आल्या आहेत. POSH Act,२०१३ च्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात दिनांक २२/०८/२०२५ च्या शासन निर्णयान्वये सुचना निर्गमित करण्यात आल्या असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

जिते, नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथील नवीन आरोग्य केंद्राची इमारत कार्यान्वित करण्याबाबत

(४३) * ६२०९ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, श्री.अमित गोरखे, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिते, नेरळ (ता.कर्जत, जि.रायगड) येथे कोट्यवधी रुपये खर्च करून नवीन आरोग्य केंद्राची इमारत उभारण्यात आली असून, सदर आरोग्य केंद्राच्या इमारतीस दीड वर्षांचा कालावधी होऊनही या आरोग्य केंद्रात अपुऱ्या मूलभूत सोयी-सुविधा, कर्मचाऱ्यांची नियुक्ती न होणे या कारणांमुळे या इमारतीचा वापर आरोग्य केंद्राकरीता होत नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयात आवश्यक डॉक्टर व कर्मचारी यांची नियुक्ती करून व आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून सदरहू नवीन आरोग्य केंद्र पूर्ण क्षमतेने सुरु होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश आबिटकर : (१) हे अंशतः खरे आहे.

जिते येथील उपकेंद्राच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये उपकेंद्र इमारतीचे हस्तांतरण झाले आहे.

तालुका आरोग्य अधिकारी, कर्जत यांच्या स्तरावरुन उपकेंद्र, पिपलोली येथील समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक व आरोग्य सेवक महिला यांना दिनांक २८/०५/२०२५ पासून अतिरिक्त कार्यभार देण्यात आला असून सदर कर्मचारी उपकेंद्र, जिते येथे उपस्थित राहून रुग्णांना नियमित आरोग्य सुविधा पुरवित आहेत.

(२) पदभरती करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

डॉ. विलास आठवले
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.